माणूस म्हणून आदर पाहिजे
सामान नको, सन्मान पाहिजे

हुंड्याची मनमानी
म्हणजे बाईची मानहानी

हुंडा प्रथा अपराध आहे
मानवी मूल्यांचा ऱ्हास आहे

हुंडा नाही मुलाचा हक्क
तो आहे माणुसकीला कलंक

साधेपणानं विवाह होईल
तर माणूसपणाची किंमत राहील

हुंडा नको, प्रेम द्या
संपत्तीत अधिकार द्या



# हुंडा

## परंपरा नव्हे बाजारीकरण

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशक** | : | अखिल भारतीय जनवादी महिला संघटना<br>महाराष्ट्र राज्य समिती<br>५ ई, एन्सा हटमेंट्स, महापालिका मार्ग,<br>आझाद मैदाना जवळ,<br>मुंबई - ४००००१.<br>दूरध्वनी : ०२२-२२६२१००७ |
| **मुद्रक** | : | न्यू एज प्रिंटींग प्रेस<br>प्रभादेवी, मुंबई - ४०००२५. |
| **अक्षरजुळणी** | : | श्वेता ग्राफिक्स प्रा. लि., पुणे. |
| **मुखपृष्ठ** | : | दीप्ती विसपुते |
| **विशेष आभार** | : | डॉ. अनघा वनारसे, डॉ. किरण वनारसे,<br>प्रा. माया पंडित, विद्या कुलकर्णी |
| **मूल्य** | : | पाच रुपये |
| **प्रकाशन** | : | २४ ऑगस्ट २००३ |


# हुंडा

## परंपरा

## नव्हे

## बाजारीकरण

**अखिल भारतीय जनवादी महिला संघटना**
**महाराष्ट्र राज्य समिती**

# अनुक्रमणिका


पुस्तिकेच्या निमित्ताने ३

हुंडा प्रथेच्या विस्तारणाऱ्या कक्षा : एक दृष्टिक्षेप ५
रजनी पालरीवाला

'देज' कडून 'दहेज' पर्यंत १७
महाराष्ट्रातील पाहणीचे निष्कर्ष

माध्यमातून हुंडा प्रथेला दुजोरा २०

हुंड्यासंबंधी गुन्ह्यांचे वाढते प्रमाण २२

हुंडा प्रतिबंधक कायद्याविषयी २९

काही पर्यायी विवाह पद्धती ३२

आपला कृती कार्यक्रम ३७


## पुस्तिकेच्या निमित्ताने....

तळागाळात स्त्रियांच्या दैनंदिन प्रश्नांवर काम करीत असताना ते किती गुंतागुंतीचे, अनेकपदरी आहेत याची पदोपदी जाणीव होत जाते. विशेषतः कौटुंबिक अन्यायाची प्रकरणे हाताळत असताना, स्त्रियांकडे 'ओझं' म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन किती खोलवर रुजला आहे हे लक्षात येतं. माओने म्हटल्याप्रमाणे स्त्रियांचे हात अर्धे आकाश पेलत असताना, घरात, शेतात, कारखान्यात व इतरत्र राबत असलेल्या स्त्रियांनी काम करण्याचे थांबवले तर संपूर्ण व्यवस्थेचे 'चक्काजाम' होईल ! तरीही पोर जन्माला आली की कसंबसं तिला वाढवून, एकदा वयात आली की तिचं पटकन कुठेतरी लग्न जमवून मोकळं व्हावं अशी भावना आई-वडिलांमध्ये सर्रास दिसते.

मग आपल्याच जात-पोटजातीचा आणि कमीत कमी 'दक्षिणेवर' ज्याचे समाधान करता येईल अशा मुलाचा शोध सुरू होतो. 'पाहण्याच्या' कार्यक्रमांमधून स्वभाव, आवडी-निवडी, घरातले वातावरण, या पेक्षा मुलीच्या घराचे 'द्रव्यबळ' तपासले जाते. (शेअर) बाजारातल्या बोलीप्रमाणे 'वायदे' ठरतात. शेती विकली जाते, शेकडा वीस-पंचवीसच्या दराने सावकाराकडून कर्ज काढली जातात. लग्नमंडपात ऐनवेळी नवनवीन मागण्या करणारा 'नवरदेव' नाराज होऊ नये आणि आपली 'अब्रू' जाऊ नये म्हणून मेटाकुटीला आलेले आई-बाप केविलवाणी धडपड करताना दिसतात.

ही पैशाला चटावलेली मंडळी पुढे लग्नानंतर कधी सणासुदीचे कारण दाखवून तर कधी निव्वळ 'भांडवल' या स्वरूपात धंदा-पाणी चालवण्यासाठी सतत पैशाची वस्तुंची मागणी करीत राहतात. यासाठी स्त्रियांना मारले, डागले, उपाशी ठेवले जाते. काहींचा चक्क खून होतो. अनेक जणी पोराबाळांसकट माहेरी परततात. तर काही कंटाळून स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून घेतात किंवा जवळच्या विहीरीत उडी घेतात. एवढे सगळे करून परत हळद लावणारे अनेक 'हुंडा बहाद्दर' आम्ही पाहिले आहेत. दुर्देवाने, या मागण्यांना कठोरपणाने विरोध करून त्या परतावून लावणारे, आपल्या लेकीला संरक्षण देणारे फार कमी भेटतात.

हुंड्याची समस्या काही नवीन नाही. हुंड्यापायी लग्न होत नाही म्हणून आत्महत्या करणाऱ्या केरळच्या तीन भगिनींचे वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर झळकलेले विदारक छायाचित्र आजही अनेकांना आठवत असेल. ८० च्या दशकात वाढत जाणाऱ्या 'हुंडाबळीं'च्या समस्येकडे लक्ष वेधून या देशातल्या स्त्रीचळवळीने त्याविरुद्ध लढा पुकारला. आज मागे वळून पाहताना असे दिसते की हा प्रश्न अधिकाधिक विकृत स्वरूप धारण करू लागला आहे. 'रोगापेक्षा औषध जालीम'प्रमाणे 'हुंडा नको' म्हणण्याऐवजी 'मुलगीच नको' असे म्हणणारे पुढे सरसावले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर समाजाच्या प्रगतीसाठी करण्याऐवजी, आज गावोगावी सोनोग्राफीची यंत्र घेऊन फिरणारे उदार डॉक्टर आणि त्यांचे गिऱ्हाईक असलेले पालक, यांच्या संगनमताने

गेल्या १० वर्षात महाराष्ट्रात लाखो मुली 'नाहीशा' झाल्या आहेत. जागतिकीकरणामुळे फोफावणाऱ्या बाजारू उपभोगवादी संस्कृतीमुळे आज प्रत्येक लग्नात चमच्यापासून पलंगापर्यंत 'संसार उपयोगी' वस्तू देण्याची पद्धत रूढ होऊ लागली आहे. वास्तविक, हे काही तथाकथित पारंपरिक हुंडा पद्धतीत बसणारे नाही. टी.व्ही. सिनेमांमधून दाखवली जाणारी चकचकीत जीवनपद्धती (लाईफस्टाईल) आणि त्याचे अनुकरण करण्यासाठी धडपडणाऱ्या युवक-युवतींची संख्या बरीच मोठी आहे. परिणामी, आज आपल्या लग्नात 'मेहेंदी' आणि 'संगीत' किंवा 'बुफे' सारख्या पूर्णतः 'फिल्मी' संकल्पना घुसून स्वार झाल्या आहेत.

सर्व मानवी व्यवहारांना बाजारपेठेच्या सौदेबाजीचे नियम लावू पाहणाऱ्या जागतिकीकरणाच्या धोरणांमुळे दिवसेंदिवस शासन आपल्या कल्याणकारी भूमिकेपासून मागे हटत आहे. आजपर्यंत गृहित धरलेले रेशन, शिक्षण, आरोग्य, पाणी सुद्धा प्रचंड महाग आणि सर्वसामान्यांच्या आवाक्या पलीकडच्या गोष्टी ठरू लागल्या आहेत. यातून येणारी अस्वस्थता, नैराश्याला तोंड देण्यासाठी बरेच लोक मनःशांती देऊ करणाऱ्या बुवाबाजीचा आधार घेताना दिसतात. प्रवचने, सत्संग, उपासांची मालिका, यासाठी लोक एकत्र जमतात. परंतु आपल्या समस्यांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करून सामुदायिक लढ्यातून उत्तर शोधण्याऐवजी प्रत्येकजण आपले 'मानसिक' समाधान शोधत आहे. या एकूण प्रक्रियेत जुने रीतीरिवाज आणि धार्मिक विधींकडे लोकांचा कल वाढत आहे. पूर्वी ज्यांनी अभिमानाने नोंदणी पद्धतीने स्वतःचे लग्न लावले, त्यांचीच मुले आता भपकेबाज धार्मिक पद्धतीने विवाह करताना, मुलांची मुंज करताना दिसतात. यातून जातीभेद आणि स्त्री-पुरुष विषमतेवर आधारित सनातनी सामाजिक चालीरीती परत एकदा समाजमनावर कब्जा करीत आहेत. आज सर्वच धर्म - जाती समुदायात हुंडापद्धती पसरली आहे, ही चिंतेची बाब आहे.

तेव्हा हुंड्याकडे एकांगी पद्धतीने पाहता येणार नाही, आणि हुंडा विरोधी लढा केवळ 'देण्या-घेण्या' पुरता मर्यादित ठेवता येणार नाही. लिंगपरिक्षेच्या विरोधात पण आवाज उठवला पाहिजे. बाजारू संस्कृती रुजवणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आणि त्यांना भारतात जागा करून देणारे इथले प्रस्थापित वर्ग, तसेच सनातनी दृष्टिकोनातून स्त्रियांना मालमत्तेत समान हक्क नाकारणारे इथले सत्ताधारी, यांच्या सर्वांच्या विरोधात तितक्याच हिरीरीने लढायला हवे.

अर्थात, हे काम केवळ स्त्रियांचे किंवा महिला संघटनांचे नाही. त्यात पुरुषांना, आणि आजच्या युवा पिढीला मोठे स्थान आहे. कोणताही लढा करीत असताना त्याबद्दल वैचारिक स्पष्टता आणि पुरेशी माहिती असणे गरजेचे असते. या पुस्तिकेद्वारे ते काही प्रमाणात उपलब्ध होईल अशी आमची आशा आहे. आपण आमच्या सोबत या सामाजिक लढ्यामध्ये निःसंकोचपणे सहभागी व्हाल याची आम्हाला खात्री वाटते.

**अखिल भारतीय जनवादी महिला संघटना**



# हुंडाप्रथेच्या विस्तारणाऱ्या कक्षा : एक दृष्टिक्षेप

**रजनी पालरीवाला**

१९७५ नंतरच्या वर्षामध्ये महिला आंदोलन पुन्हा जोमदारपणे उभे राहात असताना 'हुंडा', विशेषतः 'हुंडाबळी' हा प्रश्न ऐरणीवर आणला गेला. नवरा आणि सासरच्यांनी पैशांची आणि चैनीच्या वस्तूंची हाव न संपणारी आहे. त्यापायी पत्नी, सुनेला पेटवण्यापर्यंत, जीवे मारण्यापर्यंतही त्यांची मजल जाऊ शकते. हा प्रश्न धसाला लावण्याचे प्रखर प्रयत्न झाले. तथापि आज हुंड्याची प्रथा अबाधित आहे. एवढंच नव्हे तर तिची पाळेमुळे एखाद्या विषवेलीसारखी अधिक घट्ट आणि अधिक विस्तृत झालेली दिसत आहेत.

आज आपण २१ व्या शतकात प्रवेश केला आहे. कसा आहे आपला आजचा भारत ? इथं उच्चभ्रू मंडळी एकाच वेळी प्राचीन परंपरांचे आणि आधुनिक औद्योगीकरणाचे ढोल बडवतात. 'शॉपिंग मॉल्स' मधून चैनीच्या वस्तू ओसंडून वाहत आहेत. इथल्या कुटुंबातल्या माता 'त्यागी' आणि मुली 'आज्ञाधारक' आहेत. इथल्या लग्नात मॉडेल्सच्या धर्तीवर अत्याधुनिक पेहेरावांचे प्रदर्शन मांडले जात आहे. असा आपला भारत।

विवाह म्हणजे दोन तरुण व्यक्तींचा आणि त्यांच्या कुटुंबीयांचाही मिलाप. या नव्या नातेसंबंधावर शिक्कामोर्तब करण्यासाठी लग्नाच्या वेळी विधींचा भाग म्हणून भेटवस्तू दिल्या-घेतल्या जातात. आहेर केले जातात. पैसे दिले जातात आणि वरपक्षाची हरप्रकारे बडदास्तही राखली जाते. ही प्रथा काही आजकालची नाही, तर पूर्वापार चालत आलेली आहे. त्याचबरोबर हुंडाप्रथेला विरोध वा त्याला आळा घालण्याचे प्रयत्न पूर्वीही झाल्याची उदाहरणे आहेत.

तामिळनाडूतल्या चोला कालखंडातील शिलालेखांमध्ये किंवा १८ व्या शतकात जयपूरच्या महाराजांनी काढलेल्या हुकुमनाम्यामध्ये हुंड्याच्या प्रथेवर खरमरीत ताशेरे मारलेले आढळतात. 'ही प्रथा घातक असून त्यामुळे चांगली चांगली कुटुंबे दारिद्र्याच्या खाईत लोटली जातात', असे त्यात म्हटले आहे. अशा भयंकर विधी प्रथांवर नियंत्रण आणले पाहिजे अशी मागणीही केलेली आढळते. गेल्या शतकातील सामाजिक सुधारणांच्या चळवळीने आणि नंतर स्त्रीमुक्ती चळवळीने ह्या मुद्द्याला पुन्हा हात घातला; उग्र आंदोलने केली, लढा उभारला. परिणामी भारत सरकारने एक हुंडाविरोधी कायदा केला खरा, पण तो अगदीच निकामी आणि प्रभावहीन ठरला आहे.

आज भारतातील हुंडा पद्धतीचे स्वरूप शास्त्रांमध्ये सांगितल्याप्रमाणे आहेही आणि नाहीही. पूर्वी हुंड्याचा 'शास्त्रसंमत' अर्थ काय होता? अग्नीला साक्षी ठेवून होणाऱ्या विवाहात दिली जाणारी

सर्वोत्कृष्ट गोष्ट कोणती होती? तर कन्यादान. तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेला, वाढवलेला, स्वतःचा अंश असलेली कन्या वराला भेट म्हणून देताना तिच्याबरोबर आणखीही काही भेटवस्तू दिल्या जात. पण आज हुंड्याचा अर्थ वा स्वरूप असे नाही. वडिलांच्या हयातीतच मुलीला व तिच्या पतीला दिला जाणारा वारसाहक्क म्हणजे हुंडा असे मानणे देखील समाधानकारक नाही. आजची प्रचलित हुंडापद्धती समजून घेण्यासाठी तिचं नव्यानं विश्लेषण करण्याची जरूरी आहे. त्याचबरोबर आपल्या दैनंदिन जीवनात, सामाजिक संबंधांत या हुंडाप्रथेमुळे काय घडामोडी होत आहेत, त्याही समजून घेतल्या पाहिजेत. याशिवाय आपल्या देशाच्या आर्थिक, राजकीय व्यवहारात व ते घडवणाऱ्या लोकांच्या आयुष्यात हुंड्याच्या प्रथेचे पडसाद कशा प्रकारे उमटत आहेत, हेही पाहिले पाहिजे. या साऱ्या गोष्टी समजून घेतल्याशिवाय 'हुंडा' या शब्दामागचा व्यवहार व परिणाम समजून घेता येणार नाहीत. आपल्या समाजात आज विषमता आणि असमानता अधिकाधिक तीव्र होत आहे. शोषण आणि अन्यायही वाढताहेत. हुंडाप्रथेत आपल्याला याचंच छोटेखानी, प्रातिनिधिक रूप पाहायला मिळतं. आज समाजात लिंगभेद, वर्ग व जातव्यवस्थेमुळे चालू असलेले शोषण हुंडापद्धतीत प्रतिबिंबित होतेच. याशिवाय उदारीकरणाच्या परिणामी आज फोफावलेला चंगळवादही हुंडापद्धतीत बेमालूमपणे मिसळून गेलेला दिसतो. 'अस्मिता' जपण्याच्या गोंडस नावाखाली आज मानवनिर्मित भेदांना पुन्हा उजाळा दिला जात आहे. संस्कृती जोपासनेच्या नावाखाली जुन्या प्रथा, परंपरांचे सरसकट पुनरुज्जीवन केले जात आहे. या पुनरुज्जीवनवादी, एकांगी अस्मितेचा उदो उदो करणाऱ्या प्रवृत्तीचे दर्शन हुंडाप्रथेत पडलेले दिसून येते.

**हुंडा प्रथेचे बदलते रूप**

आज भारतात हुंड्याची प्रथा नेमकी कशा प्रकारची आहे? ती कोण पाळते? तिची व्याप्ती कशी बदलली, वाढली आहे? हे आता पाहूया. पूर्वी हुंड्याची प्रथा सवर्ण हिंदूंमध्येच प्रचलित होती. त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेची बाब होती. सत्तरीच्या दशकापर्यंत मात्र ही प्रथा ख्रिश्चन, मुस्लिम, हिंदूंमधील मध्यम जातींमध्येही रुजली होती. आज तर या समुदायांतील निम्न जातींमध्येही हुंडा प्रथेने पाय रोवल्याचे दिसून येते. ज्या जमाती, आदिवासी यांमध्ये पूर्वी 'कन्या शुल्क' म्हणजे साध्या भाषेत 'मुलीला हुंडा' देण्याची प्रथा होती, तिथेही आता या पूर्वीच्या प्रथा बदलून 'मुलीबरोबर हुंडा' देण्याची प्रथा सुरू झाली आहे.

पूर्वीची हुंडा प्रथा व आजची हुंडा प्रथा यातील फरक पुढीलप्रमाणे नोंदवता येतील;

१) **पूर्वी दोन्ही बाजूने देवघेव :** आता एकाच बाजूने - पूर्वी विवाहप्रसंगी वर-वधू या दोन्ही बाजू परस्परांना भेटी, आहेर द्यायचे. विवाहात सामील झालेले लोक, दोन्हीकडचे कुटुंबीय यांना आहेर केला जाई.



आज मात्र आहेरांचे 'आदान-प्रदान' होत नाही, तर वधूपक्षाकडूनच अधिकतर आहेर केले जातात व खर्चाचा सर्व भारही उचलला जातो.

२) **हुंडा केवळ लग्नापुरता मर्यादित राहिलेला नाही :** आज हुंड्याचा परीघही प्रचंड विस्तारला आहे. केवळ विवाहाच्या वेळीच 'देणे-घेणे' होत नाही. तर वधूवरांची पत्रिका जमली की तिथपासून सुरुवात होते. पत्रिका जमली, जोडी ठरली, मग साखरपुड्यापासून प्रत्यक्ष विवाहापर्यंत, त्यानंतर बाळाचा जन्म, बारसं, त्यांची लग्नं या साऱ्या प्रसंगी आहेर अपेक्षित असतात. याशिवाय दोन्हीपैकी कोणत्याही कुटुंबात होणारे कार्य, धार्मिक विधी अशा सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या प्रसंगीही मुलाकडच्यांना मानपान केले जाते. या साऱ्याचा समावेश हुंड्यातच होतो. 'हुंडा' केवळ लग्नापुरताच मर्यादित राहिलेला नाही. मुलीच्या माहेरच्या माणसांना तिच्या सासऱ्यांबरोबर जुळून आलेले संबंध पुनःपुन्हा दृढ करावे लागतात. लग्नाला बरीच वर्षे होऊन गेली तरीही लेकीच्या संसाराला हातभार लावावा लागतो, वा भेटवस्तू, आहेर देऊन त्यांची मर्जी राखावी लागते.

३) **विवाह विधीला अवास्तव महत्त्व :** हिंदू व अन्य धर्मांमध्येही जे अनेकविध 'संस्कार' व 'विधी' महत्त्वाचे मानले जातात, त्यापैकी 'विवाह' विधी हा एक होता. पण आज तोच सर्वात महत्त्वाचा विधी झाला आहे आणि त्याची प्रतिष्ठा हुंड्याच्या किंमतीवरून तोलली, जोखली जाते.

४) **विवाहात हुंड्याला निर्णायक स्थान :** वधूपक्षाची खर्चाची तयारी, क्षमता हा विवाह जुळवण्याचा मध्यवर्ती मुद्दा बनला आहे. बाकी सर्व बाबतीत मनासारखे, जुळणारे असे स्थळ केवळ हुंड्यासाठी नाकारले जाते. ही लग्नाची बोलणी होतातही अतिशय 'सूचक' पद्धतीने. हुंडा ही आता लग्नातही 'भेट' वा 'वरदक्षिणा' राहिली नसून विवाह जुळून यावा यासाठी द्यायचे 'प्रलोभन' बनले आहे.

५) **नवनविन मागण्यांवरील वाढता खर्च :** मुलीकडच्यांची खर्चाची क्षमता हाच एकमेव घटक नाही. तर ते तो खर्च कशा वैविध्यपूर्ण रीतीने व कल्पकतेने खर्च करतात, यालाही महत्त्व आले आहे. म्हणजे नवऱ्यामुलीचा पोशाख, सासरच्यांना दिल्या जाणाऱ्या भेटी, त्यांच्या मनोरंजनासाठी सादर केलेले कार्यक्रम इ. प्रदर्शनरूपी प्रकारातून वधूपक्षाने सर्जनशील, कल्पक मार्गांनी वरपक्षाला खूश करावे लागते. इतर सर्व विधी, संस्कारांना मागे टाकणारी हुंडा ही बाब केवळ विधीपूर्वक द्यायच्या भेटवस्तूंपुरती मर्यादित राहिलेली नाही, हे स्पष्ट आहे.

आपल्या सामाजिक संबंधांचे व राजकीय, आर्थिक व्यवस्थेचे रूप हुंड्यात कसे प्रतिबिंबित होते व हुंडा प्रथेतून हे संबंध कसे उलगडतात याचाही परामर्ष या प्रथेचे खंडन करताना घेतला पाहिजे. हुंडा पद्धतीला बळकटी देणाऱ्या गोष्टी आणि हुंडा प्रथेचे परिणाम यांना एकमेकांपासून

वेगळं काढता येणं अवघड आहे. हुंडा हा स्त्री-पुरुष विषमतेचा परिणाम तर आहेच. शिवाय समाजात ही विषमता व स्त्रियांचे शोषण करणाऱ्या मूल्यांना व व्यवहारांना दृढपणे रुजवणारा नियामक घटक ही आहे.

**हुंड्याचे आर्थिक, राजकीय व मूल्यात्मक पदर**

परंपरागतरीत्या आपल्यापेक्षा उच्च कुटुंबात मुलीचं लग्न करण्याची पद्धत, हुंडा प्रथा आणि जात या तीनही गोष्टी परस्परांशी अतूटपणे जोडल्या आहेत. 'सून करावी गरीबाघरची' ही धारणा आहे. शिवाय प्रत्यक्षात जरी वरपक्ष मुलीच्या कुटुंबापेक्षा 'उच्च' नसला तरी निव्वळ तो वरपक्ष आहे, आपल्या मुलीचा भार स्वीकारून मुलाकडच्यांनी आपल्यावर उपकार केले आहेत म्हणून त्याचं श्रेष्ठत्व निर्विवादपणे मानलं गेलं आहे. या सोयरीकीमुळे आपला भार हलका झाला, प्रतिष्ठा वाढली म्हणून वरपक्षाला मधाचं बोट चाटवलं जातं, म्हणजे हुंडा दिला जातो. या देण्यातून आपण जात व नात्यांच्या सामाजिक नियमांचं चोख पालन करत आहोत, हेही सार्वजनिकरीत्या दाखवता येतं.

मुलीला हुंडा देऊन माहेरच्या कुटुंबालाही एकाच वेळी अनेक गोष्टी साधता येतात. तिला त्यांनी आपल्याच कुटुंबातलं मानलेलं आहे, ही भावना व्यक्त करता येते. त्यांच्या आर्थिक प्रतिष्ठेला बाधा पोहोचत नाही. शिवाय आपल्यापेक्षा उच्च कुटुंबाशी सोयरीक जुळल्याने त्यांची सामाजिक प्रतिष्ठाही उंचावते. पण ही प्रथा पूर्वी केवळ ब्राह्मण जातींमध्ये होती, अन्य जातीत नव्हती, हेही लक्षात घेतले पाहिजे. ब्राह्मणेतर समाजात हुंड्याचे प्रस्थ व व्याप्ती मर्यादित स्वरूपातच होती. दक्षिणेकडील भागात जमीन, भूप्रदेश वा उत्पादक साधने हुंड्यापोटी दिली जात, पण उत्तर भारतात मात्र तसे नव्हते.

भारतात ब्रिटिश येण्याआधी म्हणजे भांडवलशाहीपूर्व काळात जी समाजव्यवस्था होती ती आर्थिक व सामाजिक विषमतेवर आधारित होती. ब्रिटिश अंमलात त्यांनी जुन्या सरंजामी व जातीधिष्ठित समाजव्यवस्थेला धक्का न लावता बाजारपेठेचे अर्थकारण आणि भांडवली विकास या प्रक्रिया लादल्या. त्यामुळे एकीकडे सामाजिक विषमता अधिक तीव्र झाली, तर दुसरीकडे नव्या अर्थकारणाची घडी बसत गेली तसतशी सरंजामी, जातीधिष्ठित नियमांची जाचक बंधने शिथिल होण्याच्या प्रक्रियांनाही वेग आला. एकीकडे शहरातल्या बड्या उद्योजकांना मोठाले धंदे सुरु करण्यासाठी शासनसत्तेचा पाठिंबा मिळू लागला. पण जमीन सुधारणेसारखे मूलभूत बदल न झाल्याने ग्रामीण भागातली परिस्थिती जैसे-थे राहिली.

१९८५ नंतर देशात उदारीकरणाचे वारे वाहू लागले. आर्थिक उदारीकरण आणि भांडवली उपभोगवादी जगाने भारतातल्या मध्यमवर्गासमोर नव्या सुबत्तेचे, नव्या संधींच्या स्वप्नांचे मायाजाल



उभे केले. या वर्गाच्या हाती कधी कल्पनाही केली नव्हती असा पैसा खुळखुळायला लागला. या नव-धनिक लोकांना आपल्या संपत्तीचे प्रदर्शन मांडण्याची गरजही भासू लागली. या आधीही सत्तेच्या नाड्या हाती असलेल्या सत्तावंतांच्या हाती नव्या व्यवस्थेचीही पकड कायम राहिली. विवाह आदी सामाजिक व्यवहार व जीवनपद्धतींवर या नव-धनिक समाजगटाचेच वर्चस्व प्रस्थापित झाले. पण सर्व समाज काही अशा रीतीने धनिक झाला नाही. अनेकांच्या जमिनी गेल्या, नोकऱ्या गेल्या, गरीब - श्रीमंत यातील विषमतेच्या दऱ्या अधिकच रुंदावल्या.

अर्थव्यवस्थेत आज बेहिशोबी काळ्या पैशांचं साम्राज्य आहे. अधिकारी वर्ग आणि नोकरशाही भ्रष्टाचारानं बरबटलेली आहे. शेअर गुंतवणुकीतून धनलाभ, भ्रष्टाचार, काळा पैसा यामुळे एवढा धनसंचय झाला आहे की तो केवळ कपाटात, गाद्यागिरद्यात लपवून ठेवणंही अशक्य आहे. त्यामुळे क्रेडीट कार्डे खिशात टाकून पैशांची बेसुमार उधळपट्टी करणारा, आंतरराष्ट्रीय पातळीवर हितसंबंधांची जोडणी करणारा गुळगुळीत नवश्रीमंत वर्ग उदयाला आलाय. त्यांची लखलखाटी जीवनशैली, बॉलीवुडचा झगमगाट आणि हॉलीवुडची आधुनिकता यांनी नव्या आकांक्षा आणि प्रतिष्ठेच्या नव्या कल्पना उभ्या केल्या आहेत. किंबहुना नवीन अर्थव्यवस्था घडवणाऱ्या या नवीन नियामक गोष्टी बनल्या आहेत.

जाहिरातींवर जगणाऱ्या माध्यमांनी चैनीच्या वस्तुंचे भुलवणारे प्रदर्शन घराघरात मांडले आहे. ते भलेही आज तुमच्या आवाक्यात नसेल, पण उद्या तुम्हाला ते मिळू शकते, हा संदेशही या प्रदर्शनाचा अविभाज्य भाग आहे. ज्यांच्या हाती नव्याने, औट घटकेसाठी का होईना, पैसा खुळखुळतो आहे, त्या नवश्रीमंत वर्गाच्या गळी हा संदेश उतरवला जात आहे. मध्यमवर्गही या कचाट्यातून बाहेर नाही. नव्यानं मध्यमवर्गात पदार्पण केलेला हा पैसेवाला वर्ग चंगळवादी संस्कृतीचा केवळ पुरस्कारच करत नाही, तर त्याचा अंगिकार करून आपणही उच्चभ्रू आहोत हे दाखवून द्यायला तयार झाला आहे. त्यालाही पैशांची उधळपट्टी आणि त्याचे डोळे दिपवून टाकणारे प्रदर्शन करणे अनिवार्य वाटते. उदारीकरणाच्या या नव्या 'युगधर्मा'ची तत्त्वेच मुळी अशी आहेत की जो ओरबाडून घेणार त्याला सारं मिळणार. आणखी हवं... ही हाव नाही तर तो हक्कच आहे. त्यासाठी गुंतवणूक करायची ती नव्या प्रतिष्ठेत, नव्या जीवनशैलीत ! म्हणजेच पर्यायानं चंगळवादाच्या आहारी जायचं. प्रतिष्ठा आणि नवी जीवनशैली ही चंगळवादी भांडवलशाहीनं गुंतवणुकीसाठी खुली केलेली नवी क्षेत्रे आहेत.

**उदारीकरणाच्या लाटेत अधिक घट्ट होणारी जात व हुंडा प्रथा :**

एकदा 'प्रतिष्ठा' आणि 'भपकेबाज जीवनशैली' या गुंतवणुकीच्या नव्या क्षेत्रांना आलेलं महत्त्व लक्षात घेतलं की खर्चिक लग्न आणि हुंड्याचं वाढतं प्रस्थ ही सुद्धा प्रतिष्ठेची बाब कशी बनते, हे

लक्षात येतं. पूर्वीच्या समाजजीवनात जातीची अस्मिता, नात्यांचे संबंध आणि परंपरेचे दंडक केंद्रस्थानी होते. तुमची प्रतिष्ठा मिरवायला व सिद्ध करायला हे घटक कारणीभूत होते. आता त्यात हुंड्यावर वारेमाप खर्च आणि लोकांचे डोळे दिपवणारा भपकेबाज समारंभ यांची भर पडली. तसं केल्यानं तुमच्या संपत्तीचं चारचौघात प्रदर्शन मांडता येतं, तुमच्या प्रतिष्ठेवर शिक्कामोर्तब होतं. आंतरराष्ट्रीय स्तरावर वावरू पाहणाऱ्या उच्च व मध्यमवर्गीयांना अशा प्रघातातून एकाच वेळी त्यांच्या तथाकथित आधुनिकतेचं व त्याच वेळी परंपरा प्रियतेचं प्रदर्शनही मांडता येतं. 'आधुनिक' जीवनातील साऱ्या सुविधा स्वीकारायच्या आणि त्याचबरोबर 'परंपरा' या नावाखाली खपणाऱ्या गोष्टींची झूलही पांघरायची, असा हा नवा मिलाफ सुरु झाला आहे. त्याबरोबरच पारंपरिक, सांस्कृतिक प्रथांचा बाजार व प्रदर्शन मांडणे याला उत आला. 'आम्ही आमची आदिम, प्राचीन अस्मिता व व्यक्तिमत्त्व कसे जसेच्या तसे ठेवले आहे,' असा बडेजाव मांडणाऱ्या राजकीय विचारधारा आपला प्रभाव प्रस्थापित करत आहेत. या दोन्ही प्रवृत्तीही चंगळवादी संस्कृतीने सुरु केलेल्या नव्या प्रवाहात सामील झाल्या आणि त्यातून हुंडा प्रथा व पंचतारांकित विवाह समारंभ हे जणू कौटुंबिक जिव्हाळा व प्रेम सिद्ध करायला अपरिहार्य ठरू लागले.

अशा प्रकारे हुंडा प्रथेला नवसंजीवनी मिळत असतानाच, हुंड्याची व्याप्तीही बरीच वाढली. दक्षिण भारताच्या काही भागात पूर्वी विवाह जुळवताना आपल्याच समाजातली, नातेसंबंधातली मुलगी शोधली जाई. आता त्यात बदल झाला आहे. आता अधिक हुंडा देणारी मुलगी शोधली जाते वा आपण हुंडा देणार त्या तोलामोलाचा मुलगा शोधला जातो. इथेही एक दुहेरीपणा आहे. म्हणजे असे की नव्या आर्थिक, सामाजिक उलथापालथीतही पारंपरिक नाती टाकाऊ ठरत नाहीत. उलट नव्या अनोळखी जीवनशैलीचा अंगिकार करताना हीच जुनी नाती आधाराची वाटतात. त्याचबरोबर गतकाळात प्रतिष्ठित, पण आता आर्थिक ताकद कमी झालेल्या परिवारांना आपली सामाजिक प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी हुंडारूपी साधन मिळाले. घरात चैनीच्या वस्तू हव्यात, धंद्यासाठी भांडवल हवं अथवा नोकरी मिळवण्यासाठी लाच द्यायचीय, तर त्यासाठी रक्कम उभारायची हुंडा ही एक संधी बनले. त्यासाठी जातीअंतर्गत विवाह लिंगभेदाधिष्ठित व्यवहार आणि पिढीजात श्रेष्ठ कनिष्ठत्व अबाधित राखणेही अत्यावश्यक ठरले. विवाहांवर पूर्वीप्रमाणेच थोरांचे नियंत्रण चालू राहिले. जातीपातीत विवाह, हुंडा देणं आणि थाटामाटात लग्न करणं हे पूर्वीइतकंच, किंबहुना त्यावेळपेक्षाही अधिक महत्त्वाचं बनलं. कारण त्यातूनच नव्या समाजात नव्या प्रतिष्ठेने वावरता येऊ लागले.

आजच्या 'सुयोग्य' पद्धतीने जमवलेल्या विवाहात लिंग, जात, पिढी यांच्या उतरंडीचे महत्त्व अबाधित आहे, म्हणून हुंड्याचेही. मुलामुलींना विवाहाचं स्वातंत्र्य देणं म्हणजे पारंपरिक लग्नातून



मिळणाऱ्या सर्व लाभांवर पाणी सोडणं. शिवाय जात आणि कुटुंबाची प्रतिष्ठा याहीपेक्षा व्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व देणं. त्यातून हुंड्यापोटी मिळणाऱ्या वस्तू, मिळवत्या पोरांच्या कमाईवर नियंत्रण ठेवण्याची हुकूमी संधी व आशाही संपुष्टात येते. त्यामुळे असे स्वतः ठरवलेले विवाह खपवून घेतले जात नाहीत. लग्न आणि देण्याघेण्याचे व्यवहार मोठ्यांनीच ठरवायचे, लग्न जातीतच करायचं किंवा मुलामुलींनी आपणहून काही ठरवू नये यासाठी लहान वयातच त्यांची लग्न उरकायची हे रिवाज अधिकाधिक मजबूत होताना दिसत आहेत. त्यामुळे हुंडाविरोधी चळवळीने जाती व्यवस्थेविरुद्धही प्रखर भूमिका घेतली पाहिजे.

समाजात नव्या जोमाने फोफावलेल्या हुंडाप्रथेत इथल्या सर्वसाधारण आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक प्रवाहांचे प्रतिबिंब कसे पडते, हे आपण पाहिले. हुंडाप्रथा ही या बदलत्या प्रवाहांचा परिणामही आहे. आणि त्याचवेळी या सर्व प्रक्रियांना खतपाणी घालणारी व्यवस्था, व्यवहारही आहे.

## हुंडा, स्त्रियांचा संपत्तीवरील अधिकार आणि स्त्रियांच्या कामाचे मूल्य

वडिलांच्या हयातीत मुलीला दिलेला वारसाहक्क वा स्त्रीधन म्हणून हुंड्याकडे पाहिलं पाहिजे, असं मानलं जातं. पितृप्रधान कुटुंबव्यवस्थेत मुलींना पित्याच्या संपत्तीत वाटा मिळत नाही. मग किमान हुंड्यामुळे तिला काही प्रमाणात वाटा मिळू शकतो, असा युक्तिवाद केला जातो. शिवाय भेटवस्तू दिल्यामुळे माहेरप्रमाणेच सासरीही तिला सुखसोयी उपलब्ध होतील; असंही मानलं जातं. असंही माडलं जातं की, सासरच्या घरी तिथल्या आर्थिक व्यवहारात मुली लक्ष घालू शकत नाहीत. त्यामुळे हुंड्याच्या रुपाने दिलेली रक्कम तरी त्यांना स्वतःची म्हणून वापरायला मिळते. त्यामुळे हुंडा न देणं म्हणजे मुलींना अधिकच असहाय बनवणं. या युक्तिवादात एक अंतर्विरोध आहे. जे सासर मुलीला पैशांच्या बाबतीत कोणताच अधिकार देत नाही, ते तिला तिच्या स्त्रीधनावर अधिकार देईल हे समजणं भंपकपणाचं आहे. शिवाय हुंडा हा काही मुलीला दिला जात नाही. हुंड्याची रक्कम नवरा व सासरच्यांकडे सुपूर्द केली जाते. मग त्यावर मुलींचा अधिकार राहील, हे समजणं वास्तविक कसं ठरेल?

हुंडाप्रथेचं समर्थन करताना आणखी एक गोष्ट ठासून मांडली जाते. ती म्हणजे, 'मुलींनाच वाटतं की आपल्याला हुंडा मिळावा म्हणून.' हे खरं की लग्नाच्या वेळी मुलीला खूप महत्त्व मिळतं. ऐपतीप्रमाणे तिला माहेराहून अनेक भेटवस्तू मिळतात. आपल्यावरील प्रेमापोटी आईवडिलांनी हे सारं द्यावं, करावं असंच मुलींना वाटत असतं. पण शेवटी या लग्नात मिळालेल्या वस्तूंवर आपला काही अधिकार राहात नाही, हेच मुलींच्या अनुभवाला येतं. सासरी आपल्या शब्दाला काही महत्त्व नाही वा 'माहेराहून आणखी वस्तू आण' हा घोषाही संपलेला नाही, हा अनुभवही तिला

येतो. त्यावेळी ती बिचारी काही बोलूही शकत नाही. हे असंच चालतं, अशी ती स्वतःची समजूत करून घेते. सासर घरातली आपली किंमत आपण आणलेल्या हुंड्यावरून ठरते, यात काही गैर आहे, असंही तिला वाटत नाही. लोभाचा कधी अंत होत नसतो. त्यामुळे तो पुरा करणं अशक्य आहे. लोभ म्हणजे हुंड्याची मागणी, अपेक्षा जितकी मोठी तितकी मुलीची किंमत कमी हे समीकरण मात्र आपण पक्क लक्षात घ्यायला हवं.

हुंडा म्हणजेच मुलीची किंमत वा महत्त्व हे रुढ समीकरण जर बदलायचं, तर स्त्रियांचं त्यांच्या आयुष्यावर नियंत्रण पाहिजे. त्यासाठी पित्याच्या संपत्तीत मुलीला वाटा मिळायला पाहिजे. त्या हिश्यावर तिचाच अधिकार राहील अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी पाऊलं उचलली पाहिजेत.

स्त्रियांना एकूणच आर्थिक साधनांवर, विशेषतः जमीन व इतर स्थावर, जंगम उत्पादन साधनांवर, काही अधिकार नाही, त्यांना त्यातून पद्धतशीर वगळलेलं आहे. हुंड्याच्या प्रथेमुळे आणि तिच्या फोफावण्यामुळे स्त्रियांना संपत्तीच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याच्या सत्ताकारणाला बळकटीच येते. हुंडा प्रथेचं समर्थन करणारे लोक असंही म्हणतात की लग्न केल्यावर वरपक्षाच्या लोकांनी वधूचं ओझं आयुष्यभरासाठी उचलायचं ठरवलेलं आहे. (कारण बाई म्हणजे ओझं, ती काही संपत्ती निर्माण करणारी नव्हे, ती अनुत्पादक !) हुंडा म्हणजे वरपक्षानं हे ओझं वाहण्याच्या त्यांच्या कष्टाबद्दल त्यांना दिलेली भरपाई ! आता हा युक्तिवाद काय दर्शवितो? एकतर स्त्रियांना उत्पादक श्रमप्रक्रियेतून वगळून टाकणं, मोबदला मिळणारी कामं करण्यापासून त्यांना वंचित ठेवणं, हे सारं समर्थनीय व योग्यच आहे हा छुपा पारंपरिक समज त्यात आहे. स्त्रिया जे उत्पादक व अनुत्पादक समजले जाणारे श्रम करतात त्यांची किंमत त्यातून कवडीमोल ठरते. आज स्त्रियांची पारंपरिक श्रमक्षेत्रे (काम) संपुष्टात येताहेत आणि नव्या आधुनिक श्रमक्षेत्रांमध्ये पोचण्याच्या संधी बायकांपर्यंत पोचत नाहीत. त्यामुळे स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यावरही प्रचंड मर्यादा पडताहेत असे दिसते. आज विलक्षण गतीने स्त्री कामगार कंत्राटी कामांच्या असंघटित क्षेत्रात फेकल्या जात आहेत. स्त्रिया व पुरूष यांच्यातील आर्थिक विषमतेची दरी रूंदावत चालली आहे. ही दरी हुंड्यातून भरून निघेल असे अजिबात म्हणता येत नाही. अगदी ज्या कुटुंबात स्त्रिया पुरूषांएवढेच अर्थार्जन करतात तिथेही त्यांना 'सगळं खाऊन संपवणाऱ्या', 'गळ्यातली धोंड' असेच मानले जाते. 'स्त्रिया मिळवत तर काहीच नाहीत, उलट घरातूनच त्या स्वतः न मिळवलेली संपत्ती लुटून घेऊन जातात आणि कुटुंबाला नागवतात. त्या अर्थार्जन करीत नाहीतच, शिवाय त्यांना पोसावं लागतं, त्यामुळे कुटुंबाची स्थिती खालावते. म्हणून त्यांनी हुंडा आणलाच पाहिजे,' असा युक्तीवाद केला जातो.

हुंडा म्हणजे वडिलांच्या हयातीतच मिळालेला संपत्तीतला वाटा, हुंडा म्हणजे बाईला पोसावं लागण्याची जबाबदारी घेतल्याबद्दल दिलेली भरपाई - या हुंडाप्रथेचं समर्थन करणाऱ्या



युक्तिवादांवरून काय दिसतं? १९७५ पासून स्त्री चळवळ सातत्याने असं मांडत आली आहे की हुंड्याची प्रथा म्हणजे स्त्रियांचं अवमूल्यन, त्यांच्या विषम, दुय्यम स्थानाचं चिन्ह. भारतीय समाजात ही विषमता, दुय्यमता बाईला जन्माला आल्यापासून मरेपर्यंत अनुभवावी लागते. हुंडाप्रथा हे त्याचंच प्रतिबिंब आहे. लग्न केल्यानंतर ते आजन्म टिकून राहील याची खात्री देता येणं आज अवघड झालंय, हे खरं, तरीदेखील आर्थिक व सामाजिक अस्तित्वासाठी बाईला लग्नावरच अवलंबून राहावं लागतं. म्हणून भारतात स्त्रीपुरुष समानता प्रस्थापित व्हायची असेल तर आपल्याला हुंडाप्रथेविरुद्ध संघर्ष करायला हवा, आणि त्याचवेळी पिता आणि पती (माहेर व सासर) च्या संपत्तीत स्त्रियांना (समान) अधिकार मिळावेत, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र / स्वावलंबी होण्यासाठी त्यांना रोजगार / काम मिळावे, आणि स्त्रियांचे श्रम व काम यांचे पुनर्मूल्यांकन व्हावे, या साठीही संघर्ष उभारायला हवा.

**हुंडा प्रथा आणि दरिद्रीकरण**

हुंडा जसा फोफावला आहे तसेच त्याचे एक खास वैशिष्ट्यही समजून घेऊ. आपल्या समाजात 'प्रौढ जबाबदार समजलं जाणं' आणि 'आईबापांच्या नियमांना / शिस्तीला न पाळण्याचं स्वातंत्र्य मिळणं' या दोन्ही बाबी, लग्नावरती अवलंबून असतात. (लग्न झालं की मुलगा / मुलगी जबाबदार बनते, लग्न झालं की आईबापांच्या जोखडाखालून सुटका होते... इत्यादी) अर्थात मुलांपेक्षाही हे मुलींच्या बाबतीत जास्त खरं आहे. भारतात बहुतेक सगळ्या समाजांमध्ये - त्यातल्या त्यात हिंदूंमध्ये अधिकच - आईबापांनी मुलामुलींचं शक्य तेवढ्या चांगल्या ठिकाणी लग्न लावून देऊन एकदाचं डोक्यावरचं ओझं उतरवणं, ही त्यांची सामाजिक व विधीवत जबाबदारी मानली जाते. मुलाबद्दलची जबाबदारी आणखी थोडी वेगळी ही असेल. (त्याला नोकरी धंद्यात बस्तान बसावं म्हणून प्रयत्न करणं वगैरे) पण मुलीच्या बाबतीत तर तिचं एकदा लग्न लावून देणं ही सर्वात मूलभूत जबाबदारी मानली जाते.

आईबाप कितीही गरीब असले तरी मुलगी अविवाहित ठेवण्याचा पर्याय त्यांना उपलब्ध नसतो. ज्या मुलींची हुंड्या अभावी लग्नं होत नाहीत, त्यांची कीव केली जाते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास ढासळतो. आईबापांना निर्भर्त्सनेला बळी पडावं लागतं, मुलीच्या भावांना तिच्या हुंड्याचंही ओझं वाटतं नि अविवाहित बहीण म्हणून तिला घरात ठेवण्याचंही ओझंच वाटतं. हुंडा द्यायला पैसे नसतील, आर्थिक बळ नसेल तर आईबापांपुढे दोनच पर्याय राहतात. पहिला पर्याय म्हणजे जमीनजुमला व अन्य गोष्टी कर्ज घेऊन गहाण टाकणं. खूप गरीब शेतकरी कुटुंब हा मार्ग स्वीकारतात. (अनेकदा मुली आईबापांनी कर्ज, गहाण वगैरे करण्याअगोदरच आत्महत्येचा मार्ग पत्करतात) अशा कर्ज, गहाणवट वगैरे प्रकरणांतून शेतकरी कुटुंबे कर्ज, कर्जफेड व दारिद्र्य अशा दुष्टचक्रात

अडकतात. जमीन जुमला, घरदार गमावून बसतात आणि हुंडा देण्यासाठी त्यांना कर्ज देणाऱ्या वा गहाणवाट करायला लावणाऱ्या सावकार वा अन्य धनिक मंडळींची धन करतात. ही मंडळीही हुंडा प्रथेचं प्रच्छन्न समर्थन करीतच असतात.

हुंडा देऊ न शकणाऱ्या गरीब कुटुंबांपुढचा आणखी एक मार्ग म्हणजे जो हुंडा मागायला असमर्थ आहे, जो हुंडा मागू शकत नाही त्याच्याशी मुलीचं लग्न लावून द्यायचं. मग तो वयानं बराच मोठा असो, हे त्याचं दुसरं किंवा तिसरं लग्न असो (त्याला आधीच्या लग्नातून झालेली पोरं असोत, त्यांना सांभाळायची जबाबदारी असो) त्याला कामधंदा असो वा नसो, किंवा तो चांगलं काम करून भल्या मार्गानं चरितार्थ चालवीत असो वा नसो, त्याला घाणेरड्या सवयी असो ! मुलीच्या कुंकवाला धनी हवा, म्हणून मग पोटच्या पोरीचं लग्न अशा माणसाशी लावून दिलं जातं. मग बिचारीचं आयुष्य खस्ता खाण्यात, वंचित राहण्यात आणि बहुधा मारहाण सोसण्यात जातं. अनेकदा तर अशा वेळी मुलीचं लग्न मध्यस्थामार्फत जमवून लांबच्या स्थळांशी केलं जातं. म्हणजे मग नवऱ्या मुलाचं वय, जबाबदाऱ्या, गरिबी, बेकारी, गुणावगुण, जातपात ह्या साऱ्या बाबींकडे दृष्टीआड सृष्टी म्हणून डोळेझाक करता येते. मुलगा योग्य नाही इकडे न बोलता डोळेझाक केली जाते. अशा परिस्थितीत तर मुलीला माहेरचा आधारच बंद होतो. अविवाहित राहण्यापेक्षा लग्न बरे म्हणून उरकलेल्या अशा लग्नामधून मुलीच्या वाट्याला खडतर एकटेपणाच येतो.

## हुंडा, मुलींची हत्या आणि मुलींची हेळसांड

हुंडा म्हणजे आईबापांच्या उरावरचं ओझं, असाच हुंड्याचा अर्थ जनमानसात ठसलेला आहे. याचे दृश्य परिणाम भयंकर आहेत. आज समाजात हुंडा आणि काही विशिष्ट प्रघात यांच्यात आपल्याला एक निश्चित कार्यकारणसंबंध दिसून येतो. विशेषतः तरूण आईबापांच्या कुटुंबात तर विशेषत्वानं ! हुंड्याचं ओझं टाळता येत नसेल तर मुलीचंच ओझं मुळात कसं टाळायचं?

जनगणनेच्या २००१ च्या अहवालानुसार, आताही स्त्रियांचं लोकसंख्येतलं प्रमाण घटत चाललं आहे. ही बाब १९७५ सालच्या 'स्त्रियांचा दर्जा' समितीच्या अहवालानंही नोंदवली होती. २००१ च्या जनगणना अहवालावरून हे स्पष्ट दिसतंय की एकूण लोकसंख्येत एकूण पुरूषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी झालीच आहे. पण त्याहीपेक्षा चिंताजनक बाब म्हणजे लहान मुलांपेक्षा लहान मुलींचं प्रमाण फार अधिक झपाट्याने कमी होत आहे. पंजाब (दर १००० मुलांमागे ७९३) हरयाना (८२०) हिमाचल प्रदेश, गुजराथ, महाराष्ट्र इतकंच नव्हे तर केरळ सारख्या पूर्वी बरे प्रमाण असणाऱ्या राज्यातही आता मुलींचे प्रमाण अधिक घटलेले दिसते. मुलींचे हे घटते प्रमाण आणि हुंडा प्रथा बळकट करणारे आजच्या समाजातले वर चर्चा केलेले प्रवाह यात एक निश्चित कार्यकारणसंबंध आहे. लहान मुलींकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, त्यांची हेळसांड हा त्या प्रक्रियांचाच परिपाक आहे.



स्त्री अर्भकांच्या गर्भजलात होणाऱ्या हत्या व लहान मुलींचे मृत्यू यांचे प्रमाण वेगाने वाढते आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे व संशोधनाचे साहाय्य घेऊन या गर्भजलहत्या करणारे वैद्यकीय व्यावसायिक बहुतेक स्वतःच्या मुलींच्या हुंड्याची सोय करण्यासाठी पैशाच्या मागे धावत हे प्रवाह आणखीच दृढपणाने रूजवताहेत. भारतासारख्या पितृसत्ताक परंपरांच्या देशात 'मुलगाच हवा' म्हणत लहान मुलींच्या हत्या करणे ही काही नवीन गोष्ट नाही. अशा हत्या आधीपासूनच घडत आल्या आहेत. आज जन्माला आलेल्या आणि येऊ घातलेल्या मुलींना संपवण्याचे जे वाढते प्रमाण आहे त्यामागे केवळ 'मुलगाच हवा' हा विचार नाहीये तर 'मुलगीच नको' हा विचार अधिक बळकट होतोय. मुलींचा जन्म हीच मुळी भयंकर भीतीदायक गोष्ट वाटायला लागली आहे.

आता जर मुलींचा जन्म टाळता येत नाही तर हुंड्याचे ओझे कमी कसे करायचे? मध्यम व नोकरदार वर्गात हुंड्यावर खर्च करायला लागले म्हणून मुलींच्या शिक्षणावर खर्च करायला टाळाटाळ केली जाते. हुंड्याच्या वाढत्या महत्त्वामुळे मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवण्याची वृत्तीही वाढीस लागते मिळते आहे. शिवाय आपल्याकडे सामाजिक वातावरणच मुळी असे मानलेच आहे की नवरा बायकोपेक्षा नेहमीच अधिक श्रेष्ठ / वरचढ असायला हवा. अधिक शिकलेली बायको नसली म्हणजे याही गोष्टी सुरळीत जपल्या जातात. मुलीला अधिक शिक्षण द्यायचं म्हणजे तिच्यासाठी तिच्यापेक्षा जास्त शिकलेला नवरा शोधणे आले. जास्त शिकलेला नवरा म्हणजे त्याला जास्त चांगल्या नोकरीची, आर्थिक प्रगतीच्या संधी ! आणि जास्त चांगल्या आर्थिक प्रगतीच्या संधी म्हणजे तो जास्त मोठा हुंडा मागणार ! म्हणून आता हे जर टाळायचे तर मुलींना शिक्षण न दिले तर बरे ! शिक्षणावर करायचा खर्च तिच्या लग्नासाठी बाजूला काढता येतो. आता असेही म्हटले जाते की सुशिक्षित मुली नोकऱ्या करून अर्थार्जन करतात आणि मग त्या स्वतःच्या लग्नाचा, कपड्यालत्याचा , हुंड्याचा पैसा बाजूला शिल्लक टाकू शकतात. विशेषतः शहरी विभागात असे घडताना थोडेफार दिसतेच आहे. आपल्या लग्नाचे ओझे कमी करण्यासाठी येन केन प्रकारे धडपड करीत आपले अस्तित्व अगदीच बिनकामाचे असू नये म्हणून प्रयत्न करणाऱ्या मुली आज दिसताहेत. पण सर्वसाधारणपणे पाहिले तर मात्र मुलींमध्ये पैशाची गुंतवणूक करण्यावर हुंड्यामुळे प्रचंड बंधने येतात. मग तो शिक्षणावरचा खर्च असो वा आरोग्यावरचा, नकारघंटाच मिळते. फक्त लग्नाच्या बाजारात मुलगी कमी हुंड्याची खपावी, स्थळ बरं मिळावं म्हणून तिचं बाह्य रूप खुलवण्यासाठी जर काही करता आलं तर त्यावर थोडाफार खर्च करायला खळखळ केली जात नाही. परंतु मुलींच्या शिक्षणाला नकार म्हणजे मुलींचा आत्मसन्मान जागृत होण्याच्या संधींना नकार ! एक स्त्री म्हणून तिची समाजातली पत किंमत वाढण्याच्या नवनव्या शक्यतांना नकार. मुलींना अधिक आत्मविश्वास युक्त, आत्मनिर्भर बनण्याचा, एक स्वतंत्र मानवी व्यक्ती बनून आयुष्य

जगण्याच्या संधींना व शक्यतांना दिलेला नकार ! याचा परिणाम असा होतो की मुली देखील स्वतःचे मूल्यांकन लग्नाच्या बाजाराच्या शब्दातच करू लागतात. आणि माणून म्हणून जगण्यासाठी त्यांना जगाचा न्याय्य वाटा नाकरणाऱ्या सगळ्या मूल्यांचे व्यवहारांचे, प्रक्रियांचे आणि शक्तींचे त्या स्वतःच समर्थन व उद्घोष करू लागतात !

हुंडा हा फक्त कौटुंबिक-लग्नाच्या वेळची बाब राहिलेली नाही - पूर्ण सामाजिक व्यवहाराचे परिमाण ठरवणारा नियामक नियामक घटक बनला आहे.

■■

## हुंड्याला पुष्टी देणारे एका मुख्यमंत्र्यांचे बेजबाबदार वक्तव्य

हुंडाबंदीचा कायदा अस्तित्वात येऊन अनेक दशके लोटली तरी लग्नातली देणी-घेणी मात्र वाढताहेत. याचं कारण म्हणजे कायद्याच्या मर्यादा आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे कायद्याला बगल देऊन 'वरदक्षिणे'च्या नावाखाली स्वतःच्या मागण्यांची पूर्तता करुन घेण्याची समाजाची मानसिकता. ही लोभी मानसिकता तयार करण्यात मुख्यमंत्र्यांसारखे जबाबदार समजले जाणारे नेतृत्वही मागे नाही.

आपल्या मतदारांना खूष करण्यासाठी मंत्री, मुख्यमंत्री सततच चमकदार विधाने ऐकवत असतात. पण याचा काय परिणाम होतो हेही त्यांना समजायला हवे. गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी काही महिन्यांपूर्वी एका शेतकऱ्यांच्या मेळाव्यात बोलताना शेतकरीबंधूंना सुचवले की, 'तुमच्या मुलींच्या लग्नात तुम्ही हुंडामध्ये ठिबक जलसिंचनाची सामुग्री द्या.' हुंड्यासारख्या कुप्रथेला आळा घालण्याचे उपाय योजायचे की त्यासाठी नवनवीन गोष्टींच्या मागण्या सुचवायच्या. विकासाचा चढता आलेख दाखवणाऱ्या गुजरातेत मुलींचे लोकसंख्येतील प्रमाण दर जनगणनेत धटंताना दिसत आहे. ते हुंड्याच्या वाढत्या खर्चापोटी मुली नकोशा होत असल्यामुळेच. याचे भान सुटलेल्या मोदींचे विधान बेजबाबदारपणाचे, आक्षेपार्ह आहे. अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेने या विधानाचा निषेध केला होता. पुढील कारवाईसाठी आपली नापसंती भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षांकडे नोंदवली होती.



# 'देज' कडून 'दहेज' पर्यंत

### हुंडा पद्धतीच्या महाराष्ट्रात केलेल्या पाहणीचे काही निष्कर्ष

२००२ साली संघटनेच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून काही पालकांच्या हुंडा पद्धतीबाबत मुलाखती घेतल्या. त्यातील बहुतेकांनी त्यांच्या मुलींची लग्ने गेल्या ४-५ वर्षांत पार पाडली होती, तर इतर काही लग्नाच्या तयारीत होते. ज्यांच्या मुलाखती घेतल्या ते बहुतंशी कामगार अथवा छोट्या शेतकरी कुटुंबातील, सर्वसाधारण परिस्थितीतील होते. ७५% कुटुंबांचे मासिक उत्पन्न ५००० रुपयांपेक्षा कमीच होते. बहुसंख्य कुटुंब ही बहुजन समाजातली होती. काही नव-बौद्ध, आदिवासी आणि मुस्लिम समाजातले पण होते. उच्चवर्णीय ब्राह्मण-मराठा समाजातील कुटुंबांचे प्रमाण कमी होते.

**लग्न खर्च :** सर्वेक्षणातून असे दिसून आले की सर्वसाधारण परिस्थितीतल्या कुटुंबांनी मुलींच्या लग्नावर किमान २५,००० ते ५०,००० रु. खर्च करतात. परंतु निम्नस्तरातल्या घरांमध्ये सुद्धा लग्नावरच्या खर्चाचा वाढता आलेख दिसून येतो. रु. ५००० पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या १/३ कुटुंब मुलीच्या लग्नावर ५०,००० ते १ लाख रुपये खर्च करतात.

त्यातल्यात्यात 'साध्या' लग्नात मुलींना काही भांडी, कपाट अथवा पलंग, एक-दोन सोन्याचे दागिने, एखादे शिवणयंत्र दिले जाते. काहीजण नवऱ्याला २००० ते ५००० रोकड रक्कम देतात. पण जिथे वेगवेगळ्या गृहउपयोगी वस्तु दिल्या जातात, तिथे अर्थातच खर्च ५०,००० ते १ लाख रुपयांपर्यंत वाढतो. उदाहरणार्थ, नेहमी दिल्या जाणाऱ्या 'गोदरेज' कपाट व पलंग-गादी सोबत सोफा-सेट, मांडणी, मिक्सर, टि.व्ही. इ. उपकरणे दिली जातात. अशा लग्नांमध्ये मोठी रोकड रक्कम (५,००० ते १५,०००), नवऱ्याला अंगठी किंवा चेन आणि मुलीला सोन्याचे दागिने जास्त दिले जातात.

सरकारी क्षेत्रात किंवा मोठ्या खाजगी कंपन्यांमध्ये काम करणारे आणि १०,००० रुपयांपेक्षा जास्त मासिक उत्पन्न असणाऱ्या आणि मोठ्या जमीनदार कुटुंबात लग्न खर्चाची रक्कम १ लाखापेक्षा अधिक आहे. ब्राह्मण तसेच मुस्लिम कुटुंबांमध्ये सुद्धा लग्नखर्च जास्त दिसतो.

बहुतेक वेळा लग्नातला जेवणाचा संपूर्ण खर्च मुलीच्या बाजूला करावा लागतो. काही शहरी कुटुंबात अपवादाने दोन्ही बाजू हॉल-रिसेप्शनचा निम्मा निम्मा खर्च करताना दिसतात.

**लग्नावरील खर्च वाढण्याचे कारण काय?** सध्याच्या परिस्थितीत लग्न हा एकंदरच खर्चिक प्रकार झाल्याचे दिसून येते. लग्नामध्ये विविध वेळी, विविध कारणांसाठी, सढळ हस्ते व अवाजवी

पद्धतीने खर्च होताना दिसतो. उपभोगवादी मूल्यांच्या प्रभावामुळे हा बदल झाल्याचे अनेकांनी निर्देशित केले. बाजारपेठेतील नवनव्या गोष्टींशी ताळमेळ राखण्याचा दबावही येतो. त्यामुळेच मग (अ) अत्याधुनिक फॅशनचे 'महाग' कपडे (ब) घरासाठी विविध वस्तू व नव्या ढंगाचे फर्निचर इ. (क) नवरदेवाला अत्याधुनिक पद्धतीचे कपडे, चेन, अंगठी यांचा आहेर (ड) जेवणाबरोबरच मद्यपानाची सोय आणि पाहुण्यांची सरबराई या व अशा गोष्टींवर खर्च करावा लागतो.

***एका मुस्लिम बीडी कामगार महिलेने टीव्ही, फ्रिज, कॅसेट-रेडियो, ड्रेसिंग टेबल, पलंग, चादरी, भांडी अश्या संसार थाटण्यासठी आवश्यक सर्व वस्तू दिल्या होत्या.***

नोकरीच्या कमी होत चाललेल्या संधी आणि शिक्षणावरील वाढता खर्च यापायी लग्नात नगद पैसे व सोने यांची मागणी अधिक वाढली आहे. मुलगा जेव्हा सरकारी वा अन्य सुस्थित नोकरीत असेल तेव्हा त्याच्यासाठी मुलीच्या बापाला पैसे, सोने यासह इतर अनेक मागण्यांची पूर्तता करावी लागते. असा आहेर घेणे म्हणजे आपल्या मुलाच्या शिक्षणावर केलेला खर्चाची वा चांगली नोकरी मिळवण्यासाठी केलेल्या खर्चाची भरपाई करून घेणे, असेच मुलाकडची मंडळी समजतात.

मुलीमध्ये काही तथाकथित वैगुण्य वा शारीरिक अपंगत्व असेल तरीही पैशांची मागणी वाढते. यामध्ये अर्थात कशाचाही समावेश होतो. सर्वसामान्य रुप, काळा रंग, शारीरिक कमजोरी, थोराड वय अथवा पत्रिकेत 'मंगळ' असणं अशा कोणत्याही कारणांसाठी पैसे सढळ हाताने खर्च केले तरच सोयरीक जुळू शकते. लग्नानंतरही विविध सणांच्या निमित्ताने वा बाळाच्या जन्माच्या वेळीही पैसा व आहेर यांची मागणी केली जाते, असेही काहिंनी सांगितले.

**हुंडा प्रथा पूर्वीच्या काळातही होती का?** आपल्या समाजात हुंडा देण्याघेण्याची प्रथा नसल्याचे निम्म्या पालकांनी सांगितले. उरलेल्यापैकी काहिंनी त्यांच्यात हुंड्याचा रिवाज असल्याचे मान्य केले, पण त्याची सुरुवात गेल्या २०-३० वर्षात झाल्याची पुस्तीही जोडली. यापैकी बऱ्याच पालकांचे स्वतःचे विवाह १९७० च्या जवळपास झालेले होते. त्यामुळे आईला त्यावेळी अत्यंत मोजक्या गोष्टी (५ भांडी आणि काही दागिने व काही ठिकाणी गादी इत्यादी) हुंड्यापोटी मिळाल्या होत्या, असं काहिंनी सांगितलं. यातील बहुतेक लग्नात रोख रक्कमेची देवघेव झालेली नव्हती.

या पालकांच्याही पालकांच्या लग्नात काय रिवाज होता, याचीही आम्ही चाचपणी केली. बहुतेकांनी त्यावेळी 'देज' म्हणजे मुलीला आहेर पैसे देण्याची पारंपरिक प्रथा होती असे सांगितले. मराठा समाजातील मध्यम जाती, दलित व बहुजन समाजात तर लग्नासाठी मुलाने मुलीच्या पित्याला पैसे देण्याची प्रथा होती. मुलीकडच्यांची परिस्थिती अगदीच बेताची असेल तर मुलाच्या घरी विवाह होत असे. त्यामुळे जेवणावळी, पाहुण्यांची सरबराई यावरील मुलीकडच्यांचा खर्च वाचत असे. मुलीचे वडील कन्यादान करत. यावेळी एक पायली तांदूळ, गाय, नारळाचे रोप व एखादा दागिना, अशी भौगोलिक विभागाला व आर्थिक परिस्थितीला अनुरूप भेट ते मुलीला देत. जास्त



मुली असणं म्हणजे जीवाला घोर, असं त्याकाळी समजलं जात नव्हतं, असंही एका पालकांनी आवर्जून नोंदवलं.

**आदिवासी समाजातल्या पद्धती :** आजही ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासी समाजात हुंडा किंवा वराला पैसे देण्याची पद्धत नाही. त्यांच्यात आजही 'देज' चा रिवाज दिसून येतो. लग्न मुलाच्या घरी होते आणि सर्व खर्च मुलानेच करायचा असतो. 'देज' मध्ये दीड क्विंटल तांदूळ, ५ किलो तूर डाळ, मुलीच्या भावाला शाल, मध्यस्थी करणाऱ्याला साडी आणि लग्न लावणाऱ्या भगताला रु. २००/- दिले जातात.

**परंतु मुलाला करावा लागणारा लग्नाचा खर्च बराच वाढलेला दिसतो. मंडप, रोषणाई, बँजो पार्टी, ताडी ऐवजी 'इंग्लिश' दारू, कपडे, पाहुण्यांची वाढलेली संख्या, लग्नाला चालत जाण्याऐवजी भाड्याचा टेंपो करण्याची पद्धत, यामुळे काही लग्नात रु. ७०,००० पेक्षा जास्त खर्च येतो.**

आदिवासी कुटुंबांमध्ये पण बदल होताना दिसतात. निम्या पालकांनी 'मांडवली'च्या वेळी जेवण, मुलीला संसारउपयोगी वस्तूंवर रु. ३०,००० ते ५०,००० खर्च केल्याचे सांगितले.

**मुलींना संपत्तीत वाटा :** सर्व्हेक्षणात मुलींना संपत्तीत वाटा देणार काय असा प्रश्न पालाकंना विचारला होता. **५५% पालकांनी 'नाही' असे उत्तर दिले.** लग्नाच्या वेळी केलेला खर्च व त्यानिमित्ताने तिला मिळणाऱ्या वस्तू दागिने इ. व्यतिरिक्त काही देण्याची पद्धत आणि गरज नाही असे बहुतेकांचे मत होते. हिस्सा देण्यासाठी आमच्याकडे संपत्ती नाही असे काहींनी सांगितले.

***मराठवाड्यातील एका श्रीमंत देशमुख जमीनदार पालकाने आपल्या मुलीच्या लग्नात वराला १.५ लाख रुपये रोकड आणि मुलीला १५ तोळे सोने दिल्याचे सांगितले. ७५ एकराची मालकी असलेल्या या जमीनदाराने आपल्या मुलाच्या लग्नात हुंडा घ्यायचे नाही असे ठरवले. सोयरीक ठरली. मुलगा-मुलगी एकमेकांना पसंत होते. मुलीकडच्यांनी दिलेली दीड लाखांची भेट या वरपित्यानं नाकारली. म्हणून दोन महिने हा ठरलेला विवाह थांबून राहिला. शेवटी हे पैसे मुलीच्याच नावाने बँक व दागिन्यात गुंतवायचे ठरल्यावर या वरपित्याने माघार घेतली.***

ज्यांनी संपत्तीत मुलींना वाटा देण्याचे कबूल केले, त्यात अशी कुटुंब होती की ज्यात फक्त मुलीच वारसदार म्हणून आहेत. मुलाच्या नावाने मालमत्तेचे हस्तांतर करताना मुलीची संमती व सही लागेल, या कारणास्तव मुलीला काही वाटा द्यावा लागेल असे एका पालकाने सांगितले ! इतरांनी नेमका किती वाटा देणार याचे स्पष्ट उत्तर दिले नाही. वारली आदिवासींमध्ये मुलगी नवऱ्याच्या घरी राहत असेल तर तिला मालमत्तेत हक्क मिळत नाही.


# माध्यमातून हुंडाप्रथेला दुजोरा

हुंड्याचे वाढते प्रस्थ, हुंडारुपाने दिल्या घेतल्या जाणाऱ्या वस्तूंचे बाजारी स्वरुप याला अधिक खतपाणी घालण्याचे काम माध्यमे, विशेषतः जाहिराती, चोखपणे बजावतात. गोरेपणा आणणारी क्रीमस् व त्याच्या जाहिराती हा यातलाच प्रकार. अमुक क्रीम वापरल्याने मुलीची कातडी 'फेअर' होते आणि 'लव्हली' ही होते आणि मुलगी सहज 'खपून' जाते असा थेट संदेश देणाऱ्या जाहिराती स्त्रियांच्या मनातील आपल्या रंगाविषयीच्या न्यूनगंडावर आधारित असतात व तो न्यूनगंड अधिक बळकट करायला मदत करतात. म्हणूनच त्या आक्षेपार्ह आहेत. स्त्रियांवरील अन्यायकारक रुढी, प्रथांचे समर्थन करणाऱ्या जाहिरातींचे हे काही नमुने :




**मुलीच्या लग्नासाठी कर्जाची हमी देणारी ही जाहिरात अप्रत्यक्षपणे हुंडाप्रथेचंच समर्थन करत नाही का?**






**'त्याच्या' जन्माच्या आधीपासून 'त्याच्या'प्रती असलेल्या जबाबदारीची जाणीव करुन देणारी ही जाहिरात. गर्भातलं मूल 'मुलगा'च असेल हे गृहित धरुन केलेली ही जाहिरात मुलीच्या जन्माचाही अधिकार डावलणारी नाही का?**

## हुंडा प्रथा अपराध आहे
## मानवी मूल्यांचा ऱ्हास आहे

# हुंड्यासंबंधी गुन्ह्यांचे वाढते प्रमाण

गेल्या ४-५ वर्षात सरकारी आकडेवारीनुसार महाराष्ट्रात स्त्रियांविरुद्ध गुन्हे कमी झालेले दिसत असले तरी आपण अनुभवत असलेले सामाजिक वास्तव मात्र अगदीच वेगळे आहे. एक तर स्त्रीविरुद्ध गुन्ह्यांचे स्वरुप बदलत चालले आहे, (उदा. स्त्रीभ्रूण हत्या, तथाकथित एकतर्फी प्रेम प्रकरणातून झालेली हत्या इ.) ज्यांची नोंद त्या पद्धतीने पोलीस खात्याकडे होत नाही. टाकून देणे, दुसरे लग्न करणे इ. स्वरुपाचे गुन्हे पोलीस स्टेशन मध्ये नोंदवलेच जात नाहीत. तेव्हा या आकडेवारी बाबत साशंकता निर्माण होणे स्वाभाविक आहे.

याच अपुऱ्या आकडेवारीतून हुंड्यासंबंधी गुन्ह्यांचे विश्लेषण केले तर काय दिसते?

- एकूण स्त्रीविरुद्ध गुन्ह्यांची नोंद घटली असली तरी प्रत्यक्ष हुंड्याशी संबंधित गुन्ह्यांची नोंद सातत्याने वाढत आहे.
- बऱ्याचदा असे अनुभवास येते की स्त्रियांना आत्महत्येस प्रवृत्त करण्याचे वा छळवणुकीचे जे गुन्हे नोंदवले जातात, त्यामागे माहेराकडून काहीतरी आणावे ही मागणीही असते. म्हणजे हुंडा प्रतिबंधक कायद्याखाली हे गुन्हे नोंदवले गेले नाही तरी या गुन्ह्यांमागील कारणांमागे हुंडा वा मागणी ही असतेच. त्यामुळे प्रत्यक्ष हुंड्यासंबंधी गुन्ह्यांबरोबर याही स्वरुपाच्या गुन्ह्यांचा एकत्रित विचार केला असता, हुंडासंबंधी गुन्ह्यांचे प्रमाण ३-४% न राहता ५५-५८% पर्यंत वाढते. (पहा : तक्ता १, क्र. ९)
- हुंड्यासंबंधी गुन्ह्यांमध्ये ७०-८०% प्रकरणे ही हुंडाबळी (मृत्यू) ची असतात. **स्त्रिया प्राण गमावतात.**
- हुंडाबळीची ९०% प्रकरणे कोर्टात प्रलंबित आहेत. शिवाय पोलीस तपासातील त्रुटी आणि पाठपुराव्या अभावी बहुतेक वेळा आरोपी दोषमुक्त सुटतात. म्हणूनच सजा होण्याचे प्रमाण जेमतेम १०% आहे.

### ही आकडेवारी काय दर्शवते?

महाराष्ट्रात दर २२ तासाला, म्हणजे जवळपास दरदिवशी एक हुंडाबळीची घटना घडते. दर १६ तासांनी हुंड्याशी संबंधित एक गुन्हा घडतो. प्रत्यक्ष हुंड्यासंबंधी व स्त्री अत्याचाराच्या सर्व गुन्ह्यांचा (तक्ता १, क्र. १-६) विचार करता आपण असेही म्हणू शकतो की दर तासाला एक हुंड्यासंबंधी गुन्हा नोंदवला जातो.



## तक्ता - १

## हुंड्यासंबंधी गुन्ह्यांची आकडेवारी

| | १९९७ | १९९८ | १९९९ | २००० |
|---|---|---|---|---|
| १) हुंडाबळी | १०५ | १२७ | ११५ | १२७ |
| २) ३०४-ब कलमाखाली मृत्यू | २७९ | ३०६ | २३४ | २७० |
| ३) हुंड्यासाठी मारण्याचा प्रयत्न | ०५२ | ०५९ | ०४० | ०५६ |
| ४) हुंड्यासाठी आत्महत्येचा प्रयत्न | ०४२ | ०४२ | १२३ | ११९ |
| ५) आत्महत्येस प्रवृत्त करणे | १४६८ | १५८० | १५५२ | १२९३ |
| ६) ४९८ अ कलमाखाली छळ | ७६१० | ७००६ | ६३५२ | ६०९१ |
| ७) एकूण (१ ते ६) | ९५५६ | ९१२० | ८४१६ | ७९५६ |
| ८) एकूण स्त्रीविरोधी गुन्हे | १७२६४ | १५६५० | १५०६५ | १४४४२ |
| ९) एकूण स्त्रीविरोधी गुन्ह्यांपैकी हुंड्यासंबंधी गुन्ह्यांचे प्रमाण | ५५% | ५८% | ५६% | ५५% |
| १०) प्रत्यक्ष हुंड्याशी संबंधित गुन्हे (१-४) | ४७८ | ५३४ | ५१२ | ५७२ |
| ११) वरील पैकी एकूण मृत्यू (१-२) | ३८४ | ४३३ | ३४९ | ३९७ |

**(तक्ता क्रमांक ९६, मानव विकास अहवाल महाराष्ट्र, २००२ यावर आधारित)**

## तक्ता - २

## महाराष्ट्रात जिल्ह्यावार हुंड्यासंबंधी गुन्हे - २००१

| जिल्हा | हुंडाबळी | खुनाचा प्रयत्न | आत्महत्येस भाग पाडणे | छळ | हुंडा प्रतिबंध कायदा | एकूण गुन्हे |
|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | १० | ५ | ० | ४९६ | ० | ५११ |
| अकोला | ३ | १ | २९ | १८९ | ० | २२२ |
| अमरावती | ४ | १ | ४३ | १४७ | १ | १९६ |
| औरंगाबाद | १५ | ३ | ७७ | ३४९ | ० | ४४४ |
| बीड | १ | ० | ४३ | १७७ | ० | २२१ |
| भंडारा | १ | १ | १३ | ६० | ९ | ८४ |
| बुलढाणा | ३ | ४ | ३८ | २२३ | ० | २६८ |
| चंद्रपूर | ० | १ | ३० | १४४ | ० | १७५ |
| धुळे | २ | १ | २५ | १२७ | ० | १५५ |
| गडचिरोली | ० | १ | १० | ५७ | ० | ६८ |
| गोंदिया | ० | ० | ६ | ८० | १ | ८७ |
| हिंगोली | ७ | ४ | ३७ | १३४ | ० | १८२ |
| जळगांव | ९ | १२ | ७२ | ३८९ | ० | ४८२ |
| जालना | ३ | १ | ३७ | १७२ | ० | २१३ |
| कोल्हापूर | २ | ० | २४ | ८० | ० | १०६ |
| लातूर | ७ | ६ | ३४ | १५० | ० | १९७ |
| मुंबई | २ | ६ | ३६ | २५५ | ० | २९९ |
| नागपूर | ७ | ६ | ४६ | ३५९ | ९ | ४२७ |
| नांदेड | १५ | १३ | ३० | २०२ | ० | २६० |
| नंदूरबार | ४ | २ | १४ | ७८ | ० | ९८ |
| नाशिक | ११ | ३ | ५४ | ४३८ | ० | ५०६ |
| उस्मानाबाद | ६ | ३ | ३ | १०२ | ० | ११४ |
| परभणी | ३ | १ | ३२ | १२० | ० | १५६ |
| पुणे | १ | ५ | १२ | ३१२ | ० | ३३० |
| रायगड | ० | ० | १३ | ५५ | ० | ६८ |
| रत्नागिरी | ० | ० | १२ | ६२ | ० | ७४ |
| सांगली | २ | २ | ३४ | ९६ | ० | १३४ |
| सातारा | ० | ० | ३७ | १७९ | ० | २१६ |
| सिंधुदुर्ग | ० | ० | १० | ८ | ० | १८ |
| सोलापूर | ७ | १ | ६९ | १५२ | ० | २२९ |
| ठाणे | ९ | ६ | ६९ | १५२ | ० | ३७७ |
| वर्धा | १ | ० | ४३ | ८९ | ६ | १३९ |
| वाशिम | ० | १ | ३३ | ११६ | ० | १५० |
| यवतमाळ | ६ | २४ | १७ | १७७ | १ | २२५ |
| | १३१ | ११४ | १०५९ | ६१०० | २७ | ७४३१ |



**मत देखो महज बुराई है, या रीत कहांसे आयी है ।**

**देखों कि दहेज में हिंसा है, देखो कि दहेज से हत्या है ।**

## तक्ता - ३

**२००१ मध्ये स्त्रियांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांची प्रलंबित प्रकरणे (महाराष्ट्र)**

| | कोर्टात दोषारोप पाठवलेल्या प्रकरणांची संख्या | कोर्टात प्रलंबित प्रकरणांची संख्या | कोर्टात प्रलंबित प्रकरणांची टक्केवारी | सजा झालेल्या प्रकरणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| हुंडाबळी (कलम ३०२+३०४ ब) | ३४३३ | ३०६० | ८९.२ | ९.४ |
| नातेवाईकांकडून छळ (कलम ४९८ अ) | ४५९१७ | ४०२७२ | ८९.८ | ५.० |
| हुंडा प्रतिबंधक कायदा | १४७ | १३९ | ९४.६ | २५.० |

(तक्ता २ व ३ : क्राईम इन महाराष्ट्र - २००१, यशदा, पुणे येथील राज्यस्तरीय कार्यशाळेत उपलब्ध करून दिलेल्या पुस्तिकेवर आधारित)


**माणूस म्हणून आदर पाहिजे**
**सामान नको, सन्मान पाहिजे**

**हुंडा हा तर अपमान आहे**
**हिंसेचंच दुसरं रूप आहे.**



# घर परिवार और देश चलाए,
# फिर क्यो औरत बोझ कहलाए?

**२००१ जनगणनेनुसार महाराष्ट्रात ० ते ६ वर्ष वयोगटातील स्त्री-पुरुषांचे प्रमाण**




**महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात ० ते ६ वर्ष वयोगटातील दर १००० मुलांमागे असणाऱ्या मुलींची संख्या या नकाशात नोंदवली आहे.**

(सौजन्य : तथापि, पुणे)

## मराठवाड्यातले 'गेट-कीन' विवाह

गेल्या दोन-तीन वर्षात महाराष्ट्र सरकारने अल्पवयीन लग्नांच्या विरोधात जोरदार मोहीम चालवली आहे. मुलाचे वय २१ वर्ष आणि मुलीचे वय १८ वर्ष असल्याशिवाय लग्न केले तर पालकांविरुद्ध गुन्हा नोंदवावा अशा सूचना पोलीसांना दिल्या गेल्या आहेत. वर्तमानपत्र-रेडियो-टी.व्ही. वरून जाहिरात केल्याने पालकांमध्ये याबद्दल बऱ्यापैकी जागृती झाली आहे. परंतु याचा अर्थ अल्पवयीन लग्नांचे प्रमाण कमी झाले आहे असे नाही ! उलट या कायद्याच्या कडक अंमलबजावणीतून 'गेट-कीन' नामक खास विवाह-पद्धती निर्माण झाली आहे !

'गेट-कीन' लग्न म्हणजे मुलगी अल्पवयीन असल्याने लग्नपत्रिकेशिवाय, दोन्ही बाजूंच्या मोजक्याच नातेवाईकांच्या साक्षीने लावलेले लग्न. अशा लग्नात मुलीच्या वडिलांना मंडप - जेवणावळी-आहेर इ. व खर्च करावा लागत नाही, तेव्हा हा खर्च रोख रक्कमेच्या रूपात त्यांच्याकडून 'वसूल' केला जातो. थोडक्यात, अल्पवयीन मुलीचे लग्न लावताना आता पैशाच्या रुपाने जास्त हुंडा द्यावा लागतो !

'गेट-कीन' या शब्दाचे मूळ मोठे मजेशीर आहे ! राज्यातल्या सहकारी साखर कारखान्यांचा पगडा महाराष्ट्राच्या राजकारण अर्थकारणावरच नाही तर समाजकारणात सुद्धा त्याचा कसा शिरकाव झाला आहे याचा हा उत्तम नमुना आहे ! साखर कारखान्याच्या दरवाज्यावर ('गेट') ऊस ('केन') पाठवून ज्याची रोकड (कॅश) रक्कम मिळते त्याला 'गेट-केन' असे म्हणतात. बऱ्याच वेळा हा ऊस कारखान्याच्या मूळ सभासदांचा नसतो. नियमाप्रमाणे सभासदांचा ऊस स्वीकरणे बंधनकारक असताना हा व्यवहार बेकायदेशीर ठरतो. तरीही अनेक कारखान्यांमध्ये तो सर्रास चालतो. 'गेट-केन' शब्दात जो रोकड आणि गैरकायदेशीर व्यवहार अभिप्रेत आहे, तोच 'गेट-कीन' विवाहत दिसून येतो !



## हुंडा प्रतिबंधक कायद्याविषयी

''हुंडा प्रतिबंधक कायदा'' १९६१ साली मंजूर झाला. देशातील महिला आंदोलनाच्या दबावाखाली १९८४ व १९८५ मध्ये त्यात काही सुधारणा करण्यात आल्या. या कायद्याच्या ठळक तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

- हुंडा म्हणजे अशा प्रकारचे आर्थिक व्यवहार (मालमत्ता, रोख पैसे, मौल्यवान वस्तू, खरेदी पत्र इ. स्वरूपाचे) की जे विवाह करण्याच्या शर्तीवर केले जातात, आणि ज्याच्या मिळण्यावर किंवा न मिळण्यावर विवाह होणे किंवा न होणे अवलंबून असते.
- हुंडा घेणारे-देणारे व घेण्यास मदत करणारे सर्व व्यक्ती या कायद्यानुसार शिक्षेस पात्र ठरतात.
- या कायद्याखाली कमीत कमी ६ महिने व जास्तीत जास्त २ वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा व १० हजार रुपये किंवा हुंड्याच्या किंमती एवढी रक्कम, या पैकी जी जास्त असेल तेवढा दंड अशी तरतूद आहे.
- लग्नात वर-वधू यांना आहेर म्हणून दिलेल्या वस्तुंचा 'हुंडा' या व्याख्येत समावेश होत नाही. परंतु मिळालेल्या भेट वस्तुंची यादी ठेवून त्यावर दोघांच्या सह्या असणे कायद्याने बंधनकारक आहे.
- हा दखलपात्र गुन्हा असल्यामुळे न्यायदंडाधिकारीच्या (ज्यूडिशियल मॅजिस्ट्रेट) कोर्टात पोलीस आरोपपत्र (चार्जशीट) दाखल करून फौजदारी खटला नोंदवू शकतात. पोलीसांनी टाळाटाळ केल्यास पालक, नातेवाईक अथवा मान्यताप्राप्त सामाजिक कल्याणकारी संस्था सुद्धा फौजदारी खटला दाखल करु शकतात.

४० हून अधिक वर्ष हा कायदा अस्तित्वात असूनही त्याचा वापर करून तक्रार नोंदवणाऱ्यांची संख्या अल्पच आहे. उदा. २००१ साली म्हणजे १९९३ व १९९४ मध्ये या कायद्यात दुरुस्ती झाल्यानंतरही संपूर्ण महाराष्ट्रात फक्त २७ गुन्हे हुंडा प्रतिबंधक कायद्याखाली नोंदवले गेले. ३४ जिल्ह्यांपैकी फक्त ६ जिल्ह्यांत हे गुन्हे नोंदवले गेले (तक्ता क्र.२). हुंडा समस्येला उग्र स्वरुप येत आहे हे एका बाजूला दिसत असताना कायद्याचा वापर होत नाही हे ही दिसते. यामागे दोन प्रमुख कारणे आहेत. एक कारण म्हणजे आपल्या मुलींची लग्न होणार नाहीत या भीतीपोटी पालक तक्रार नोंदवत नाहीत. परंतु दुसऱ्या बाजूला हुंड्याचे आजचे जे स्वरुप आहे, त्याला आवर घालण्यात हा कायदा कमी पडतो.

या कायद्यातील महत्त्वाच्या त्रुटी अशा आहेत.

- 'हुंडा' या व्याख्येतून भेटवस्तुंना वगळले आहे. वास्तविक आज 'हुंडा' याच पद्धतीने घेतला व दिला जातो. आई वडिलांनी दिलेल्या भेटवस्तुंच्या मूल्यावर बंधन घालण्याची संसदीय निवड समितीची शिफारस राज्यकर्त्यांनी मान्य केली नाही. ''आहेराची किंमत देणाऱ्या व्यक्तीच्या सांपत्तिक स्थितीपेक्षा जास्त असू नये'' एवढेच नमूद केले आहे.
- 'लग्न संबंधात दिलेली वस्तू अथवा रक्कम' या पुरते आज हुंड्याचे स्वरुप राहिलेले नाही. लग्नानंतर काळात सुद्धा विविध स्वरुपाच्या मागण्या होत राहतात, त्याचा विचार कायद्यात नाही.
- संसदीय निवड समितीने एकूण लग्नखर्चावर मर्यादा घालण्याची शिफारस केली होती. ही सूचना कायद्यात समाविष्ट केलेली नाही.
- केवळ मान्यताप्राप्त संस्थांना तक्रार नोंदवता येते. कोणत्याही महिला संघटना/मंडळ/सामाजिक संस्थेला हा हक्क असावा.
- हा कायदा केल्यानंतर त्याचा प्रचार-प्रसार करण्यासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न केलेले दिसत नाही.

**हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ - परिणामकारक करण्याच्या दृष्टीने प्रारंभ**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने हुंडा प्रतिबंधक अधिनियम १९६१ च्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी अधिनियमात सुधार सुचविले आहेत, ते असे.

- हुंडा देणाऱ्यास शिक्षा होण्यापासून वंचित करणे त्याने कुठल्यातरी दबावाखाली हुंडा दिलेला असतो. तेव्हा फक्त हुंडा मागणाऱ्या व घेणाऱ्या व्यक्तीस सदर कायद्याखाली शिक्षा व्हावी.
- कलम ३ (२) प्रमाणे भेट वस्तूंची यादी सादर न करणाऱ्यास ३० दिवसांपर्यंतची कैद व रु. १५,०००/- आर्थिक दंड करण्यात यावा.
- प्रत्येक विवाह निबंधक कार्यालय त्यांच्या कार्यकक्षेतील विवाह नोंदणीबाबतचा तपशील हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्याकडे दर महिन्यास सादर करील. त्या अनुषंगाने हुंडा प्रतिबंधक अधिकारी या कायद्याच्या तरतुदीनुसार विवाहितांनी त्यांना मिळालेल्या भेट वस्तूंची यादी सादर केलेली आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करील.

**नियमांमध्ये तरतुदींचा समावेश :**

- विवाह प्रसंगी भेटवस्तू न घेतलेल्या वधु-वरांनी हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्यांकडे भेटवस्तू न स्वीकारल्या बाबतचे निरंक विवरणपत्र सादर करावे.



- शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम किंवा खाजगी उद्योगधंदा यामधील स्त्री-पुरुष कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विवाह प्रसंगी किंवा त्या दोघांपैकी कुणाच्याही आई-वडिलांनी विवाह झाल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत भेट वस्तूंची यादी सादर करावी तसेच वधू-वर व त्यांच्या पालकांनी यादीवर स्वाक्षरी करावी.
- शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम व अन्य उपक्रमातील पुरुष कर्मचाऱ्यांनी त्याचा विवाह झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्यांच्या कार्यालय प्रमुखाकडे, त्याने विवाह प्रसंगी हुंड्याची मागणी केलेली नाही असे प्रमाणपत्र सादर करावे.

**सेवा वर्तणूक नियमांमध्ये फेरबदल :**

सामान्य प्रशासन विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभागाने शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम कर्मचाऱ्यांच्या सेवा वर्तणूक नियमांमध्ये खालील प्रमाणे फेरबदल करावे.

अ) कर्मचाऱ्याने निरंक विवरणपत्र सादर न केल्यास हे कृत्य गैरवर्तणूक समजले जाईल व ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील.

ब) हुंडा प्रतिबंधक कायद्याखाली कुठल्याही कर्मचाऱ्याने विवाह प्रसंगी हुंडा घेतल्यास दोषी ठरविल्यास ती गैरवर्तणूक समजून जास्तीत जास्त शिक्षेस पात्र ठरेल.

या व्यतिरिक्त भारतीय दंड विधान (इंडियन पीनल कोड) मध्ये हुंडा संबंधी पुढील महत्त्वाची कलमे आहेत.

**कलम ४९८-अ :** कोणत्याही स्त्रीचा नवरा किंवा नवऱ्याचे नातवाईक तिला शारिरिक किंवा मानसिक त्रास देत असतील किंवा तिच्या माहेरच्या माणसांकडून कोणत्याही मिळकतीची (पैसे, जमीन, वस्तु इ.) बेकायदेशीर मागणी करीत असतील तर या कलमाखाली तीन वर्ष कारावास व दंडाची शिक्षा होऊ शकते.

**कलम ३०४ (ब) व कलम ३०६ :** हुंड्यासाठी छळ झालेल्या स्त्रीचा सासरकडून छळ होत असेल आणि लग्नापासून ७ वर्षांच्या कालावधीत तिचा मृत्यु (हुंडाबळी) झाल्यास ३०४ (ब) कलमाखाली पती-सासरच्या लोकांना जबाबदार धरून गुन्हा दाखल करता येतो. तसेच या छळापायी त्या स्त्रीला आत्महत्येस प्रवृत्त केल्यास ३०६ कलमाखाली गुन्हा दाखल करता येतो. या दोन्ही कलमांखाली १० वर्षांचा कारावास आणि दंडाची शिक्षा आहे.

हुंड्यासंबंधी सर्व गुन्हे हे दखलपात्र व तडजोड न करता येण्याजोगे असतात.

# काही पर्यायी विवाह पद्धती

## सत्यशोधक विवाह सोहळा

महात्मा फुले यांनी विषमतामूलक रूढी, परंपरा, धर्म, संस्कृतीला पर्यायी संस्कृती उभी केली. त्याच प्रक्रियेतील एक भाग म्हणजे सत्यशोधक विवाह पद्धती. सत्यशोधक विवाह पद्धत ही पुरोहिताशिवाय लग्न लावणारी चळवळ होती. लग्नविधीसारख्या आनंदाच्या उत्सवात समाजाला लुबाडणारा, फसवणारा भिक्षुक मध्यस्थ नको असे ही चळवळ सांगते. तसेच पारंपरिक सप्तपदी व मंगलाष्टकांमधून स्त्रिया म्हणजे केवळ अर्धांगिनी असून त्यांनी पतीची सेवा करावी, त्याने कितीही व्यभिचार केले तरी त्याच्याशी एकनिष्ठ रहावे अशा प्रकारचे विचार वदवून घेतले जात. महात्मा फुल्यांनी या मंगलाष्टकांनाही पर्याय दिला. सत्यशोधक मंगलाष्टके ही समाजपरिवर्तनाभिमुख आहेत त्यात नवरा मुलगा नवरीला विद्या देण्याचे वचन देतो तर ती स्वातंत्र्याची ओळख तू मला करून दिली पाहिजे असे सांगते. तेव्हा नवरा मुलगा 'स्थापाया अधिकार मी झटतसे' असे अभिवचन या मंगलाष्टकातून देतो. ही मंगलाष्टके स्त्री-पुरुष समता सांगणारी, स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात.

मंगलाष्टकांप्रमाणेच सत्यशोधक विवाहविधीसुद्धा समाजपरिवर्तनाभिमुख आहे. म. फुले यांनी १९ व्या शतकात जे विधी सांगितले ते वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कारण लग्न म्हंटले की तो जातीबद्ध संस्कार मानला गेला. जातीतच लग्न करणे, जातीतील माणसांनाच लग्नसमारंभात बोलवण्याची पद्धत दिसते. जात ही मुळातच विषमताग्रस्त आहे आणि ही विषमता संस्कार, रूढी, परंपरा यातून टिकविली जाते. म. फुले या सर्वांच्या विरोधात होते. सत्यशोधक विवाह पद्धतीतून त्यांनी गावगाड्यातील सर्व जातींचे संमेलन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. सोनाराकडून कुलस्वामीच्या टाकास उजाळा देणे, परिटणीच्या हातून धान्याचा चौक करणे, दलित स्त्रीच्या हातून वधु-वरांस ओवाळणे असे नियम सांगून सर्व बहुजनांना लग्नसमारंभात सहभागी करून घेतले. केवळ वरमाला अर्पण करून किंवा अभिवचने देऊन विवाह पूर्ण होतो असे नाही तर समाजाचा तो एक आनंदोत्सव असतो. रात्री सर्वांनी सामूहिक जेवण करणे, गोंधळ मांडणे या पद्धतीही त्यात आहेत. मुळातच समतेवर आधारित समाजनिर्मितीसाठी तयार झालेल्या सत्यशोधक चळवळीने जशी भिक्षुकाशिवाय लग्ने लावली तसेच आंतरजातीय विवाहांचाही पुरस्कार केला. पुणे जिल्ह्यातील ओतूर, नारायणगांव, तर नाशिक जिल्ह्यातील येवला, मनमाड, वनसगांव आणि विदर्भातील काही गावांमध्ये आजही सत्यशोधक पद्धतीने विवाह होतात.

**पद्धत :** विवाहाच्या सुरूवातीला सत्यशोधक विवाहपद्धती संदर्भात उपस्थित वऱ्हाडाला माहिती



दिली जावी. यानंतर वधु व वराकडील एक एक हितचिंतक किंवा सामाजिक कार्यकर्ता यांनी वधुवरांच्या भावी आयुष्यास शुभेच्छापर मनोगत व्यक्त करावे. वधुवरांच्या मातापित्यांनी एखाद्या सामाजिक संस्थेस निधी (दान) द्यावा. वधु-वरांनी सर्व प्रथम आपल्या आई-वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या या ओळी म्हणाव्यात...

पहिले आमचे नमन जन्मदात्या मायबापांना, कष्ट हाल सोसून शिकविले तुम्ही मुलांना

त्यानंतर विवाह प्रसंगीच्या हा विवाह स्त्री-पुरुष भेद व जातपात विरोधी असल्यामुळे खालील मंगलओव्या प्रामुख्याने स्त्रियांनी म्हणाव्यात.

**सत्यशोधक विवाह आपण दोघे करू या, स्त्रीमुक्तीचे स्वप्न हो मनी आपल्या धरूया ।**
**अभिवचन दे मला 'सत्यशोधक' राहशील, भांडणतंट्या खेरीज आयुष्य हे जाईल ।**
**दोघांच्या मतांनी संसार करू या, जनहितासाठी हो आपण दोघे झटू या ।**
**समतेने वागून ज्ञान-ज्योत लावून, जात-पात तोडूनी प्रेमाने राहूत ।**

या मंगलओवींनंतर वराने व त्याच्यानंतर वधूने पुढील शपथ घ्यावी -

"आजपासून मी तुला माझी पत्नी म्हणून स्वीकारून या सर्व उपस्थित स्त्री-पुरूषांसमोर अशी प्रतिज्ञा करतो की तुझ्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा आदर करीन आणि तुझ्या सर्व सुखदुःखात सहभागी राहीन. समाजपरिवर्तनाच्या कार्यात तुला मनःपूर्वक साथ देईन. व्यक्तिगत, कौटुंबिक व सामाजिक जीवनात परस्पर सहकार्याने तुझ्याशी एकनिष्ठ राहून जीवन व्यतित करीन."

ही शपथ घेतल्यानंतर वधुने वराला व वराने वधुला हार घालावेत. उपस्थित स्त्री-पुरुषांनी पुष्पवृष्टी करावी आणि वाद्य वाजवून टाळ्यांच्या गजरात विवाहितांचे अभिनंदन करावे. त्यानंतर आभारप्रदर्शनाचे काम वधु-वरांच्या पालकांनी करावे व अल्पोपहाराने लग्नोत्सवाची सांगता करावी.

**हुंडा नको, प्रेम द्या**
**संपत्तीत अधिकार द्या**

# नोंदणी विवाह

नोंदणी विवाह वा रजिस्टर मॅरेज वा कोर्ट मॅरेज जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्त 'विवाह अधिकारी' लावतो. नोंदणी विवाहाला कोर्ट मॅरेज म्हणूनही संबोधिण्यात येते.

विवाह अधिकारी हे जिल्हानिहाय पद आहे. त्यांनी लावलेले लग्न व त्या संबंधी घेतलेले निर्णय हे जिल्हा स्तरावरील त्यांच्या अधिकारकक्षेत येत असतात. व त्यावर अपील जिल्हा न्यायालयात करता येते. म्हणजेच विवाह अधिकारी हे पद मॅजिस्ट्रेट सारखेच असल्याने नोंदणी विवाहस कोर्ट-मॅरेजही म्हणले जाते.

नोंदणी विवाह करणाऱ्यांस खालील अटींची पूर्तता करावी लागते.

१) वधु-वरांना १९५४ च्या विशेष विवाह कायद्या (स्पेशल मॅरेज ॲक्ट) अनुसार विवाहाची नोटीस विवाह-अधिकाऱ्याला द्यावी लागते. नोटीस म्हणजे एक फॉर्म असतो. जो जिल्हा कार्यालयात मिळतो. तो भरून द्यावा लागतो. हा फॉर्म विनामूल्य मिळतो.

२) नोटीस दिलेल्या तारखेच्या एक महिन्यानंतरच लग्न करता येते. नियोजित विवाहाला कोणांस आक्षेप घ्यायचा असल्यास तो घेता यावा म्हणून ही एक महिन्याची मुदत ठेवण्यात आली आहे. नोटीस कार्यालयाच्या बोर्डावर लावण्यात येते. आक्षेप वर/वधू अज्ञान असल्यास त्यांचे पालक घेऊ शकतात. वर/वधू विवाहित असल्यास त्यांचे पती/पत्नी घेऊ शकतात. परंतु नोटीस बोर्डावर लावणे ही केवळ एक औपचारीकता आहे. प्रत्यक्षात विवाह कार्यालयात कोणी जात नाही. त्यामुळे नोटीस बोर्डावर जाऊन पाहण्याचे प्रमाण खूपच अत्यल्प आहे.

३) नोटीस देण्याच्या वेळी वधूचे वय १८ वर्षे आणि वराचे वय २१ वर्षे पूर्ण असणे गरजेचे आहे.

४) विवाह करणारी व्यक्ती अविवाहीत/विधूर/विधवा/घटस्फोटीत असली पाहिजे.

५) वधूवरांपैकी एक व्यक्ती संबंधित जिल्हा-कार्यालयाच्या कार्यकक्षेत राहणारी असली पाहिजे.

६) वधू व वर भिन्न धर्माचे असले तरी त्यांना नोंदणी विवाह करण्यास आडकाठी नाही. त्यांच्या पैकी कुणासही धर्मांतर करण्याची आवश्यकता नाही.

७) लग्न, विवाह अधिकारी/मॅरेज ऑफिसर लावतो. विवाह लावतो म्हणजे शपथ देतो. कुठलाही विधी होत नाही. यासाठी अल्प फी द्यावी लागते.

८) लग्नाच्या वेळी डिक्लरेशनवर वधू-वर आणि तीन साक्षीदारांना सही करावी लागते.

९) विवाह सर्टीफिकेट मिळविण्यासाठी विवाह झाल्यानंतर तिकीट लावलेला रीतसर अर्ज करावा लागतो. त्यानंतर फी घेवून सर्टीफिकेट दिले जाते.

१०) सर्टीफिकेटवर वधू, वर, तीन साक्षीदार आणि विवाह अधिकारी यांची नावे असतात.



# आणि या मुलींनी लग्न मोडले....

एखादं ठरलेलं, होऊ घातलेलं लग्न मोडलं तर मुलीच्या आईबापावर आभाळ कोसळतं. आता आपल्या मुलीला कोण पत्करणार? ही भीती त्यांना वाटते. पण गेल्या काही महिन्यात अशा काही घटना पुढे आल्या ज्यात अशी लग्न मोडण्यात मुलींनीच पुढाकार घेतला. कारण नवऱ्यामुलाच्या व त्याच्या घरच्यांच्या मागण्या लग्नघटीकेपर्यंतही संपतच नव्हत्या.

दिल्लीच्या निशा शर्मा या तरुणीनं हुंड्याच्या मागणीसाठी नवरदेव आणि त्याच्या घरच्यांविरुद्ध पोलीसात तक्रार नोंदवली व त्यांना तुरूंगाची हवा खायला लावली. बीड जिल्ह्यातल्या अनेगावच्या मनीषा इंगळे हिने तिचा नियोजित पती व त्याच्या कुटुंबियांच्या वाढत्या मागण्यांची चीड येऊन लग्नाच्याच दिवशी बोहल्यावर लग्नाला नकार दिला. उस्मानाबाद जिल्ह्यातील वाशी गावच्या मीरा मुळेचा नवरदेव त्याला घ्यायला आलेली जीप जुनी आहे, या कारणासाठी रुसून बसला. शिवाय एकेक मागण्या वाढवायला लागला, तेव्हा मीराने लग्नालाच नकार दिला. नांदेड जिल्ह्यातील वडेपुरीच्या अनिता राऊतचं लग्न सामुदायिक पद्धतीने होणार होतं. ऐनवेळी नवरा पैशांच्या मागणीसाठी हटून बसला. तेव्हा 'हुंड्यासाठी अडणारा नवरा नको' म्हणून अनिताने त्याची मिजासच उतरवली. बीडमधील रोशनपुरी या गावातला नवरा 'भारी बूटा'साठी अडून बसला. तेव्हा मुलीकडच्यांनी आतापर्यंत केलेला खर्च वसूल करून हे लग्नच मोडून टाकले.

नवरामुलगा व त्यांच्या कुटुंबियांच्या अवाजवी मागण्या न जुमानता त्यांच्याशी लग्न नाकारणाऱ्या या मुलींचे कृत्य अत्यंत धाडसाचंच आहे. आणि शहाणपणाचंही. त्यात आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या घटनांत मुलीचे पालक, नातेवाईक तिच्या बरोबरीने उभे राहिले.

अशा विरोधातूनच हुंड्याला मिळणारी सामाजिक प्रतिष्ठा कमी करता येईल व हुंड्याला आळा घालता येईल. अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेने दिल्ली येथे निशा शर्मासह अशा काही मुलींचा जाहीर सत्कार करून त्यांच्या धाडसाचे कौतुक केले.

## मंत्र्याच्या मुलीचं 'सामुदायिक' लग्न

मंत्र्यांच्या मुला, मुलींची लग्न म्हणजे सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांचं प्रदर्शन मांडण्याची एक संधीच असते. जनतेला उत्तरदायी असणाऱ्या या लोकप्रतिनिधिंनी खरेतर खर्चिक सोहळ्यांना कात्री लावून समाजामध्ये नवा पायंडा पाडला पाहिजे. पण दिसतं ते उलटंच. या पार्श्वभूमीवर राज्याचे अबकारी कर मंत्री अनिल देशमुख यांनी उचललेलं पाऊल स्वागतार्ह आणि अनुकरणीय आहे.

नागपूरमधील काटोल या शहरात या वर्षीच्या मार्चमध्ये झालेल्या सामुदायिक विवाह सोहळ्यात विविध जाती धर्मांच्या ७४ जोडप्यांचे विवाह झाले. त्यात अनिल देशमुखांची डॉक्टर मुलगी पूजा हीचाही विवाह पार पडला. या सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी अनेक मंत्री, स्थानिक रहिवासी असे ५०,००० लोक उपस्थित होते. संत तुकडोजी महाराजांच्या शिकवणुकीवर श्रद्धा असणाऱ्या देशमुख यांनी स्वतः तर थाटामाटाच्या लग्नसोहळ्याला टाळलेच, शिवाय इतरांनीही हा मार्ग अनुसरावा असे आवाहन केले.

---

## साधेपणानं विवाह होईल
## तर माणूसपणाची किंमत राहील



# आपला कृती कार्यक्रम

**हुंडा प्रथे विरुद्ध लढण्यासाठी आपण पुढील गोष्टी करु शकता.**

- हुंडा मागणाऱ्यांशी सोयरीक करु नका.
- ज्या लग्नात हुंडा दिला घेतला आहे, अशा लग्नांना उपस्थित राहू नका.
- साध्या लग्नाचा पुरस्कार करा. मानपान, आहेर, जेवणावळी, रोषणाईचा खर्च टाळा.
- खर्चिक लग्नांचा पायंडा पाडणाऱ्या 'प्रतिष्ठित' नागरिकांच्या सोहळ्यांना विरोध करा.
- रजिस्टर्ड अथवा सत्यशोधक लग्नपद्धतींचा तसेच सामुदायिक लग्नांचा पुरस्कार करा.
- आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन द्या. आंतरधर्मीय लग्नांचे स्वागत करून त्यांना पाठिंबा द्या.

**पालकांना उद्देशून**

- मुला-मुलींचे अल्पवयात लग्न करू नका.
- लग्नापूर्वी मुलगा-मुलगी यांना एकमेकांचा परिचय होण्याची संधी द्या. मुला-मुलींना आपल्या पसंतीचा जोडीदार ठरवण्याचे स्वातंत्र्य द्या.
- मुलींना शिकवून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी पाठिंबा द्या. मुलींना मालमत्तेत समान वाटा द्या.

- आपल्या मुलीचा हुंडा अथवा इतर कारणांसाठी छळ होत असेल तर तिच्यावर होणारा अन्याय थांबवण्यासाठी तिला मदत करा. त्यासाठी महिला संघटना अथवा पोलीसांकडे तक्रार करा.
- आपल्या मुलीचा सासरी छळ होऊन दुःखद मृत्यू झाला असेल तर आपल्या केसचा पाठपुरावा करा. त्यासाठी महिला संघटनेची मदत घ्या. शिक्षा झालेले प्रत्येक प्रकरण हे हुंड्याचे वाढते प्रस्थ रोखण्यासाठी प्रतिबंधक ठरते हे लक्षात ठेवा.
- ज्यांनी पहिल्या पत्नीला सोडून दिले असेल किंवा ज्याच्या पहिल्या पत्नीचा संशयास्पद मृत्यू झाला असेल, अशा पुरुषाशी आपल्या मुलीचे लग्न करु नका.
- मुलींना ओझं मानू नका, लिंग परिक्षा करु नका.

**हुंड्याची मनमानी**
**म्हणजे बाईची मानहानी**

---

**हुंडा नाही मुलाचा हक्क**
**तो आहे माणुसकीला कलंक**



## हुंडा देणार नाही....

**हिराबाई घोंगे**

हुंडा देणार नाही जा जा जा
हुंडा घेणार नाही, नाही, नाही, नाही
असं असलं तर सुपारी फोडायची ॥ धृ. ॥

हुंड्यावरीच ज्याची नजर । त्यांना पोरीची नसते कदर।
अशा धनाची असते जबर । तिथं कुणाची नसेल खबर ।
यांची सर्वांची खोडच मोडायची
असं असलं तर सुपारी फोडायची ॥ १ ॥

हुंड्यासाठी काढले कर्ज । त्याचं भरत राहिलो व्याज ।
होई संसाराचं ओझं । महागाई वाढते रोज ।
कशी संसाराची गाडी ही ओढायची
असं असलं तर सुपारी फोडायची ॥ २ ॥

नवरा नवरीची असावी जोडी । त्यात दोघांची असावी गोडी ।
खऱ्या सुखाची ओळख नाही । व्यर्थ बंगला हवेली गाडी ।
लावून बँड अन् वरात काढायची
असं असलं तर सुपारी फोडायची ॥ ३ ॥

हुंडाबंदी पाळूया कायदा । त्यात सर्वांचा आहे हो फायदा ।
धोंडू, पांडू, ताई, बाई, आक्का । देण्याघेण्याची घाई करू नका ।
रीत हुंड्याची हाणून पाडायची
असं असलं तर सुपारी फोडायची ॥ ४ ॥